# थोडे... हसू... थोडे... आसू

अरुणा कुलकर्णी



# थोडे... हसू...

# थोडे... आसू

लेखक अरुण कुळकर्णी.

किंमत- प्रिंट कॉपी रु.१२५

डिजिटल कॉपी  फ्री

# मनातील थोडेसे

खूप दिवस काही ना काही लिहीत होतो पण एकसंध बसून पुस्तक काही बनवता येत नव्हतं. सगळ्या गोष्टी काँप्युटरमधे विखरून पडल्या होत्या. शोधून त्यांना लावत बसण्याचा कंटाळा येत होता.

आज चंग बांधून बसलो. आठ गोष्टींचं हे पुस्तक गोठवलं.

वाचताना थोडं हसू, थोडे आसू आले म्हणून पुस्तक मनाला भिडेल असं वाटतंय. एकटे जीव, इनामदारीण, मैत्रबंध, तीन शिल्पकार, त्रिवेणी संगम या नंतर हे पुस्तक प्रसिद्ध होताना फार आनंद होत आहे.

आपला अभिप्राय जरूर कळवा.

अरुण कुळकर्णी

७३५९२१२२११ किंवा ७२२८८८४०३०

ई-मेल - arungk1943@gmail.com

प्रिंट प्रकाशक व वितरक-

सुहास खोपकर
सुहास्यरेखा प्रकाशन
३, नंदधाम डुप्लेक्स
मांजलपूर, वडोदरा- ३९० ०११

डिजिटल प्रकाशन-४ मार्च २०२१
ईसाहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com

मुखपृष्ठ व आतील चित्रे-
सुहास जगताप

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

# अर्पण

माझ्या गोष्टींवर प्रेम करणाऱ्या व हक्काने माझ्याकडे नव्या नव्या गोष्टींची मागणी करणाऱ्या माझ्या सर्व रसिक वाचकांना समर्पित.

अरुण कुळकर्णी.

**कथा अनुक्रम**


१. आबा म्हार

२. तो कुठे असेल

३. जगावेगळी श्रद्धांजली


४. नर्मदा

५. माणूस

६. पोर्ट्रेट

७. मैत्रीण बायको मी व मित्रमंडळ

८. वाकळ


आधा

आज ५९ वर्षे झाली गाव सोडून. पण कोकणातलं लहानपण काही डोळयासमोरून हलत नाही. एक एक गोष्टींची सय येऊन चित्रे डोळयासमोरून झरझर सरू लागतात.

दिवाळी आली आहे. आदीवासीनी बांबूतून बनवलेल्या आकाश कंदीलांची जाहीरात समोर होती. त्या सुबक कला वस्तु पहाताना नजरेसमोर आला तो गावचा आबा म्हार.

चतुर्वर्ण जीवाभावाने पाळण्याचे दिवस. आबा खळयात बसून करटीतून दिलेला चहा पीत होता. मी दुपारच्या झोपेची झापड उडवत बाहेर आलो तर समोर आबा. आता झापड पार पळाली. "आबा.. आबा" करीत मी सुसाट खळयाकडे धावलो. "नुको... नुको.. माका शिवा नुको. शिवा नुको" आबा ओरडत होता. त्याला न जुमानता मी त्याच्या पाठीवर गळयात हात टाकून लोंबकळू लागायचो.

आजूबाजूला गोंधळ व्हायचा. "शिवलो तो आबाक"ची बातमी सगळया काम करणाऱ्यात पसरायची. मग कलकलाट सुरू. "तो ल्हान हा, आबाक नुको समजूक. पाठीर घ्यायचा नाय." असे

शेरे ऐकू येत. समोर खुर्चीत बसलेले वडील कुड्याच्या पानात बनवलेल्या विडीचे झुरके मारत शांतपणे बसलेले असत. मग म्हणत "जावा रे तुमी तुमच्या कामाक. आबा गेलो काय ओतूया चार घागरी डोक्यार.... हा आबा मग सांग पाच बांबू देतय काय काय देशीत बनवून?"

आबा सुंदर सुपे, रोवळया, डाळया(चटया) एवढेच काय पण भाताची साळ भरायच्या मोठाल्या कणग्या व तट्टे पण बनवायचा. कांहीही बनवून आणलं तरी न सांगता तो एकदा बासरी व दुसऱ्यांदा चिपनळी माझ्यासाठी आणायचा. म्हणून त्याची माझी दोस्ती होती.

त्याने बनवलेली घाटदार सुपं, रोवळया आमच्या मुंबईच्या चाकरमान्यांना खूप आवडत. त्याने बनवलेली डाळी मला तर भयंकर प्रिय. तो सामान घेऊन आला की त्यावर पाणी ओतून शुद्ध करण्याचा सोपस्कार व्हायचा. भिजलेली डाळी गुंडाळून उन्हात उभी असायची. सुकली रे सुकली की ढकलत ओटीवर नेऊन मी ती पसरवून लोळत बसायचो. नव्या बांबूच्या वासाने डाळीवरून उठायची इच्छाच होत नसे.

वडील त्याला आमच्या परसातले बांबू देत, त्यातून तो हे सर्व बनवून आणी. किती बांबू दिले तर काय द्यायचे हे वडिल आणि तो का ठरवायला तासभर घालवीत, हा प्रश्न मला शाळेत जायला लागल्यावर पडत असे. कारण आबा पुढच्याच आठवड्यात हजर

व्हायचा, "धन्यानु! काय तरी चुकला हा. बांबू कमी पडतं हत.".. "किती होये?"... "चार तरी लागतीत"... "जा घेवन". आबा मागच्या परड्यात जाऊन छान पिवळट पडलेले बांबू तोडून आणायचा. वडलांना दाखवून त्यांची मोळी बांधायचा. यावेळी त्याने माझ्यासाठी धनुकली व बाण बनवून आणलेले असायचे. मी पेरूच्या झाडावर नेम धरण्यात गर्क असताना आबा निघून गेलेला असायचा.

आबाला घरात प्रवेश नव्हता. पण आबाचा वावर मात्र घरात सगळीकडे दिसत होता. बाहेरच्या ओटीवर कणग्या आणि तट्टे उभे असत. जेवण करताना तांदूळ धुवायला आबाने बनवलेली रोवळी असायची. तांदूळ, पोहे काहीही बनवले की हासडून साफ करायला आबाचे सूपच लागायचे. देवघरात दोन सुबक सांगशा होत्या. एकात देवाचे चंदन, वापरात नसलेली निरांजने, पळया, पंचपात्री असले देवपुजेचे सामान तर दुसऱ्या सांगशीत रक्तचंदनाची बाहुली, कापूर भेंडीचे, कुड्याचे अशी कसली कसली औषधी पाळे व हरडे, बेहडे, धोतऱ्याच्या बी ठेवलेल्या असत. आबा असा ओटीपासून देवघरापर्यंत वावर करायचा. पण तो घरात येवू शकत नव्हता. कारण गावाने कसोशीने पाळलेली वर्ण व्यवस्था.

गावापासून लांब म्हारवाड्यात यांची घरं होती. यांच्याबद्दल खूप काही प्रवाद होते. खरे होते की खोटे हे जाणण्याचा कधी कोणी

प्रयत्न केला नाही. मी ही नाही. हळू हळू सर्व बदलत होतं. मी शिक्षणासाठी गाव सोडलं. मधेच रजेत गावी जाऊ लागलो. आबा काळाच्या आड गेला होता. आता पावसात कामाला गडी मिळेनासे झाले आणि गावाने तडजोड केली. आबाचे मुलगे आता गडी म्हणून राहू लागले. आबानी बनवलेल्या तट्ट्यात भात भरू लागले, ओटीवर तांदळाच्या मुड्या बांधू लागले. त्यांना करटी ऐवजी कपातून चहा मिळू लागला. आणि कर्मठ जाती वादाने सपशेल माघार घेतलेली दिसू लागली.

एक गोष्ट शिकलो- गरज भल भल्यांना सहज मात देते.

आबाची नातवंडे शिकली. सरकारी नोकरी मिळवून सुखी झाले. तलाठी, ग्रामसेवक असल्या नोकऱ्या करून पांढरपेशे झाले. आबाची कला त्याच्या बरोबर संपली.

मी इंजिनीअर होऊन लठ्ठ पगाराची नोकरी करू लागलो. शहरवासी झालो. गावचे सर्व विकले गेले. थोडी फार जमीन माझ्या नावावर होती एवढाच माझा आणि गावाचा संबंध.

गावाला एकदा जावं लागलं. शेतसारा भरायची नोटीस लागली होती. तलाठ्याकडे पोचलो. सात बारा पाहिजे म्हणून सांगीतले. तलाठी उठला. माझ्या पाया पडू लागला. मला काहीच समजेना. "आबांचो नातू मी. आजो सांगा तुमच्यो गोष्टी. आमच्या

पेक्षाय तुमची याद जास्त येय तेंका. तुमच्याबद्दल नुसता आयकललाव. आज भेटलात बरा वाटला." आबाच्या आठवणीने मलाही भरून आलं. सात बाराचा कागद त्याने बनवून मला दिला. मी शंभर रुपयाची नोट काढली.

"धा रुपयेच द्या. सरकारी दर तेवढोच हा." आबाच्या नातवाने नम्र पणे जास्त पैसे घ्यायला नकार दिला.

मी निघालो खरा पण आबा मनात विठोबासारखा उभा, आपल्या आठवणीने मला प्रसन्न करीत होता.

तो सात बारा मी आजही जपलाय. जमिनीचा अधिकार म्हणून नव्हे आबा म्हाराची आठवण म्हणून. कोकणी प्रेमाचा पुरावा म्हणून.

*****


तो कुठं असेल

काही माणसं मनात घर करून का बसतात माहीत नाही. तो त्यातलाच एक. जाम खुंटी मारल्यासारखा आठवणीत रुतून बसलाय.

आम्ही शाळेत असताना तालुक्याच्या गावी रहात होतो. मी आणि माझ्या दोन बहिणी. तसेच तो त्याच्या दोन बहिणींसह आमच्या बाजूला रहायचा. दोन्ही बहिणी मोठ्या हा छोटा. त्या हायस्कुल मधे. हा शाळेत सातवीत. माझी हायस्कुलची दोनच वर्षे बाकी होती आणि हे तिघे आमच्या चाळीतील खोलीत रहायला आले. ठाकूरांच्या चाळी खास करून शाळेतल्या मुलांसाठी किंवा बदली होऊन येणाऱ्या सरकारी नोकरांसाठीच असायच्या.

आमची चाळ सहा खोल्यांची होती. प्रत्येकाला एक पुढचा जाळीने बंद केलेला ओटा, मधली खोली, स्वयंपाक घर, मागच्या पडवीत पत्र्याने बंद केलेली न्हाणी, पुढ्यात भांडी कपडे धुण्या साठी बसवलेली एक दगडी पाथर. बाजूला भली मोठी चूल ज्याच्यावर एक तसाच भला मोठा हांडा. असा जामानीमा

असलेली ती खोली. जरी दोन खोल्या होत्या तरी त्याला खोलीच म्हणायची पद्धत.

आम्ही राहायचो ती पहिलीच खोली. तो रहायचा ती शेवटची खोली. मधे चार. मधल्या तीन सरकारी नोकरानी भरलेल्या आणि एक रिकामी. ती सरकारी कुटुंबे आपलेच कोंडाळे करून होती.

तो आमच्याच दारावरून जात येत असे. मान सदोदीत खाली. कुणाशीही नजर न मिळवता तो आपल्या खोलीत जाई. त्याच्या बहिणीही तशाच, मितभाषी. या चाळीजवळ शाळा होती. ती संध्याकाळी सुटली की तिचे मैदान आमचेच. आजूबाजूचे मित्र जमून विटी दांडू, लगोरी, आबाधोबीचा दंगा आम्ही घालू पण हा कधीच त्यात भाग घेत नसे. आपल्या खोलीसमोरच्या जागेत त्याने एक तुळशीचे झाड, दोन गुलाबाची झाडं, दोन मोगऱ्याची झाडं अशी छोटी बाग केली होती. शाळेतून आला की तो त्या चिटुकल्या बागेची मशागत करण्यात गुंग असे.

हळू हळू आमचा समज होऊ लागला की ही भावंडे शिष्ट आहेत. कोणाशीच बोलत नाहीत, सबंध वाढवत नाहीत.

एक मात्र लक्षात येत होतं. त्याच्या बहिणी फार काम करत. विहीरीवरून पाणी आणा, कपडे धुवा, जेवण करा आणि शाळा, अभ्यास सांभाळा. आमच्याकडे या कामांसाठी मुलगी होती.

म्हणून मी आणि बहिणी अभ्यास करू शकत होतो. त्यांचं काय असा विचार येत असे.

मी आता घरासमोर फेऱ्या मारायचे ठरवले. आमच्या खोलीपासून ते शेवटी त्यांच्या खोली पर्यंत. पहिल्याच दिवशी तो भेटला. "छान आहेत रे तुझी झाडं" मी संवाद साधायचा प्रयत्न केला. त्याने एक नजर माझ्यावर टाकली आणि काही न बोलता घरात पळाला. ती नजर मात्र माझ्या लक्षात राहिली. त्या पाणीदार टपोऱ्या डोळ्यात खूप भिती भरलेली दिसली. थोड्याच वेळात घरातून प्रार्थनेचा आवाज येवू लागला. तिघेही सुंदर आवाजात शुभंकरोती, रामरक्षा म्हणत होते. स्तब्ध उभा राहून मी ते ऐकत होतो.

आता माझी या तिघांबद्दलची उत्कंठा वाढू लागली. कोण होती ती? त्यांचे आई वडिल कुठे आहेत? आज दोन तीन महिने होत आले कोणच कसे भेटायला आले नाहीत?

माझ्या बहिणी पण त्याच हायस्कुलला होत्या पण एकाच वर्गात नव्हत्या.

एक दिवशी माझी बहिण म्हणाली "अरे ती मधुरा खूप हुशार आहे. तिची छोटी बहिण पण हुशार आहे. दोघी आपापल्या वर्गात

पहिल्या येतात. कमाल आहे. सगळं काम करून अभ्यास केव्हा करतात तेच समजत नाही."

आज पहिल्यांदा काहीतरी माहिती मिळत होती. "आणि त्यांचा भाऊ?" मी विचारले. तो तर विचारू नकोस. त्याला चौथीपासून स्कॉलरशिप आहे. शिवाय शाळेची फी माफ आहे. एकपाठी आहे म्हणतात".

रविवार होता. एक गृहस्थ त्यांच्याकडे आले. हा बाहेर त्याच्या बागेत काम करत होता. त्याचे लक्ष जाताच तो तो ओरडला, "ताई, आक्का मामा आलाय." धावत येवून त्याने त्याला मिठी मारली. दोघेही घरात गेले. थोड्याच वेळात सगळे तयार होऊन बाहेर गेले. काय योगायोग होता देव जाणे. आमचे वडिल त्याच दिवशी आले. त्यांच्याशी गप्पामधे एक दोन तास गेले. एवढ्यात वडिल हाक मारतच बाहेर धावले. "विठ्ठलरावSS" कोण म्हणून मी बाहेर पाहिलं तर ते त्याचे मामा होते. ते सगळे परत आले होते. खरेदीच्या पिशव्या मुलींना सोपवून ते बाबां बरोबर आत आले.

"बोला शामराव काय म्हणताय?"

"अहो तुम्ही इकडे कसे?"

"अहो ही माझ्या बहिणीची मुलं. माझी बहिण चार वर्षापुर्वी गेली. आमच्या मेव्हण्यानी दुसरं लग्न केलं. या पोरांची परवड पहावे

ना. इथे शिकायला ठेवलीत. हुशार आहेत तिघेही. खर्च परस्पर करतो. कधी गावी भेटलात तर याचा उच्चार करू नकात हा! हो नाहीतर यांची मामी मला जिवंत नाही ठेवायची."

एवढं बोलतानाच विठ्ठलराव कावरे बावरे झाले होते. ते आपल्या या बहिणीच्या मुलांची देखभाल गपचुप करत होते.

बाबानी विचारलं, "पण एवढी हुशार मुलं त्यांच्या वडलानी अनाथा सारखी का सोडलीत?"

"जाऊ द्या शामराव, ह्या जगाचा स्वार्थ किती उगाळायचा? जेव्हा मुलाना फारच मारहाण होऊ लागली तेव्हा घेऊन आलो आमच्या घरी. पोरी कामसू म्हणून आमच्या घरी दोन वर्षे बरी गेली. मग यांच्या मामीची हौस मौज कमी होतेय, खाणारी तोंडे वाढलीत ही धुसफूस घरात सुरू झाली. लवकरच समजलो. आमच्या घरचे यांचे घास संपत आले. यांची व्यवस्था करावी लागेल. अनाथाश्रमात ठेवतो सांगून घेऊन आलो. जीव नाही धजला तिथे ठेवायला. ही खोली घेतली वर्षाचे भाडे एकदम भरले. मधुनच असा चोरून येतो. कपडा लत्ता घेवून देतो. दुकान दाखवून ठेवलेय किराणाचे. लागणारे सामान उधारीत आणतात. आलो की उधारी भागवतो. पण गुणी मुलं आहेत. मामा देतो म्हणून लुटत नाहीत. अगदी जरूरी असेल त्याच वस्तु उधारीत आणतात."

विठ्ठलरावांचा गळा हळू हळू भरत चालला होता. बाबा उठले. त्यांच्या खांद्यावर थोपटत म्हणाले," विठ्ठलराव माझी मुलं राहातात इथे मी दरमहिन्याला येतोच येतो. त्यांना काय मदत लागली तर सांगायला सांगा. ही करतील मदत."

"ते तर शक्य दिसत नाही. परिस्थितीने एवढी सोशीक झालीत की काही तुम्हाला सांगणार नाहीत. फक्त माझ्याकडेच बोलतात. मी सांगीतलं तरी ते तुमच्याकडे बोलणार नाहीत."

विठ्ठलराव गेले. सर्व ऐकून मी विचारात पडलो. त्याला माणसाळावायचा कसा? त्याचे नाव गिरीधर समजले होते. आमच्या खोली समोरून जाताना त्याला हाक मारून थांबवायला पाहिलं. त्यावेळेपासून तो आमच्या घरा समोरून जाताना धावत जाऊ लागला. तो मला भेटू इच्छीत नव्हता. दुसऱ्या मार्गाचा मी विचार करू लागलो. मग बहिणीला म्हणालो, "मिनी, तू ऐकलंस ना त्यांच्या मामांना. आता तू जरा प्रयत्न कर त्याच्या बहिणींशी बोलायचा,"

"अरे केला मी प्रयत्न. पण त्या लहान बहिणीने सरळ सांगीतले. हे पहा आमच्याकडे देण्यासारखे कांही नाही. म्हणून आम्ही काही कुणाकडून घेत नाही. आज ओळख होईल उद्या तुम्ही काहीतरी आम्हाला द्याल. त्याची परत फेड आम्ही करू नाही शकणार. मग ते मनाला खात बसणार. त्यापेक्षा ओळखीच नकोत.

रागावू नका. पण सहानुभूती घ्यायची सवय लागली तर आम्ही लुळे पांगळे होऊ.

फार भारी बोलली रे ती. आपण काही केलं तरी जवळ येतील असं वाटत नाही. त्या तिघानी आपलं एक छोटसं विश्व बनवलंय. त्यातच रहाणार ते."

मी चक्रावलो. एवढी समज एवढ्या लहान वयात.

येता जाता पहात रहाणं एवढंच जमत होते. त्याने कधीच मान वर करून पाहिलं नाही. माझं हायस्कुल संपलं कॉलेज साठी गेलो आणि गाव मागे राहीलं. चार वर्षे गेली आणि पेपर मधे त्याचा सत्कार समारंभाचा फोटो पाहिला. तो बोर्डात मेरीट मधे आला होता. आमच्या जिल्ह्यात पहिला आला होता. त्याचा सत्कार जिल्ह्यात झाला होता.

बस् ही शेवटची बातमी. खूप वेळा आठवतो. गावच्या हायस्कुल मधे चौकशी केली. त्याचा पत्ता मिळवायचा प्रयत्न केला. पण तो इतका सर्वांपासून दूर रहात होता की कोणीही तो काय करतो याचा मागोवा कधी घेतला नाही.

मधेच आठवतो. तो कुठे असेल. तो सद्या काय करतो. विचाराने अस्वस्थ होतो. वाटतं माझा मागोवा घेत त्याने यावं. एका

आलीशान गाडीतून, रुबाबात उतरून मला भेटावं. सगळा इतिहास सांगावा.

मग मनात म्हणतो हे दिवास्वप्न फक्त पहाण्यासाठी आहे. खरे होईल की नाही देव जाणे.

*****


जगावेगळी
श्रध्दांजली

एकादा माणूस कोकणात, मालवणी बोलीच्या प्रदेशात जन्मला, वाढला आणि मोठा झाला तर जे रसायन तयार होते त्याची ही गोष्ट. हा कोकणी माणूस काय जाणत नाही हे विचारा. सर्वज्ञ असल्या सारखे कोणत्याही विषयावर भाष्य करू शकतो. मग ते पौराणीक असो, धार्मिक असो, व्यापाराबद्दल असो, औषधपाण्याबद्दल असो, भूत देवचारांबद्दल असो, नाटकांबद्दल असो की कायद्याबद्दल असो. या पूर्णतया कोकणी असलेल्या माणसाला वयाच्या वीशीपर्यंत सर्वज्ञानाचा साक्षात्कार झालेला असतो. कोर्ट कचेरीत सनदी वकीलच लागतात म्हणून कोकणात वकीलांचे चालते. पण प्रत्येक कोकणी माणूस कायद्याच्या ज्ञानाने परीपूर्ण असतो. सनद नाही म्हणून तो वकील नेमतो, वकीलपत्र कोर्टात सादर करतो. पण आपल्या केसमधे काय बोलायचे ह्याचे वकीलालाच ज्ञान देण्याचा शिरस्ता तो कधीच मोडत नाही.

हा नाती आणि ओळखी जपत असतो, प्रेमाने जिव्हाळयाने वागतो तो नातेवाईकांशी, शेजाऱ्यांशी, दुकानदारांशी, तलाठी, मामलतदारांशी, पोलीसांशी. आपल्या कामी लागणाऱ्या

माणसांशी ओळखी आणि जिव्हाळा वाढवत असतो, जपत असतो आणि एखाद्याशी बिनसलेच तर कायद्याची भाषा करून त्याला कोर्टातही खेचतो. सगळ्या अशा ओळखीमुळे ह्याचे कोणतेही काम कधी अडत नाही.

बाहेर गांवी जाताना बस पकडायची असेल तर एस्.टी स्टँड वरच्या हमालाचीही ओळख पुरते किंवा स्टँडचा मॅनेजर पण बैठकीतलाच असल्यामुळे तो ही याची सोय करून देतो.

असा सर्वज्ञ, सर्वसखा असूनही तो पैशाच्या दृष्टीने तसा काही फारसा पुढे येऊ शकत नाही. कारण तो सर्वज्ञांच्या प्रदेशातच वाढत असतो. त्यामुळे सगळेच दंड थोपटून शर्यतीत उतरलेले असतात. पण अशा प्रदेशातून ते बाहेर गेले की त्यांचा उदयकाळ येतोच येतो. कित्येक मालवणी बोलीच्या प्रदेशातील लोकांनी आपली हुशारी व कर्तबगारी हा प्रदेश सोडून बाहेर गेल्यावरच दाखवली. अशा या कोकणात अगदी हल्ली हल्ली पर्यंत कमालीची गरीबी होती. अगदी वतनदार म्हणवून घेणाऱ्या खोतांच्या खिशांतही दोन पांच रुपयाच्या नोटे खेरीज जास्त पैसे नसायचे. पण त्यांचे त्यामुळे कांही अडायचे नाही. कामे उधारी उसनवारीवर चालतच असायची. पावसाळी एक पीकावरचा हा प्रदेश. त्यामुळे ही उधारी चाकरमान्यां सारखी दरमहा चुकती केली जात नसे. सराईवर पीक घरात आले, त्यातून चार पैसे कनवटीला जडले, की ही उधारी

चुकती केली जाई. आता ते पूर्ण वर्षभर परत उधारी करायला मोकळे होत. खेळते पैसे असायचे ते दुकानदारी, व्यापार करणाऱ्या लोकांकडे.

या लोकांचा प्रेमाचा प्रकारही अगदी वेगळा. जीवश्च कंठश्च मित्राला देखिल भेटल्यावर अस्सल शिवी घालून संवाद सुरू करायची परंपरा कसोशीने पाळणारे हे लोक. जर ही शिवी शेलक्या शिव्यां मधील असेल तर समजून जावे की ही मैत्री फारच गाढी आणि अखंड सौभाग्यवती आहे.

आता हा प्रदेश सुद्धा सुखवस्तु होत चाललाय. चार पैसे सर्वांच्याच हातात खेळू लागले आहेत. मालवणी बोली सुधारून प्रमाण मराठीच्या जवळ पोचत आहे. पण मालवणी हेल आणि ढंग त्यातून जात नाही. मालवणी बोलीवर प्रेम करणारेही आहेत. जे अजूनही आपली मालवणी बोलीच आग्रहाने, अट्टाहासाने बोलतात. परीटघडीवाल्याना ही बोली बोलायला लाज वाटू लागली आहे. पण कांही लोक "आपली मायबोली ती" या जिव्हाळाने तिला जपत आहेत.

अशा या प्रदेशातल्या ४०-४५ वर्षापूर्वीच्या अत्यंत गरीबीच्या कालखंडातली एका आनंदी मामा व भाच्याची आगळी वेगळी गोष्ट आहे ही. वरचे सगळे गुण यांच्यात कसे भरले होते हे सहजपणे दाखवून जाते अशी गोष्ट. एका मामा भाच्याच्या दुक्कलीची.

........

आप्पा कळसुलकर चार गांवात जमीनी असलेली आसामी. घर म्हणजे एक वाडाच होता. आप्पाला दोन बहिणी होत्या लग्न झालेल्या. शेती करायला आणि दुभत्या जनावरांची निगा ठेवायला नोकर मंडळी होती. तीही वंशपरपरागत. नोकराचा मुलगाच, नोकर म्हातारा झाला, की तिथे नोकरी करायचा. दोन वेळचे जेवण, त्याच्या इतर गरजा, लग्नकार्य याची काळजी मालकाने घेतली व वर्षाला एक कांबळे आणि पायताणाचा जोड दिला, की वर्षभर हे नोकर इमाने इतबारे आपली कामे उरकीत असत. पावसात शेतकामासाठी त्यांच्याच बायका येत आणि लावणी, कापणी, झोडणी, मळणी करून भात घरात भरून देत. व पैरी म्हणून त्यांना लागणारे वर्षभराचे भात मिळवीत.

आप्पा कळसुलकर मोकळाच असे. वेळ जावा म्हणून त्याने तालुक्याच्या गावी बाजार पेठेत एक दुकान काढले होते. त्या दुकानातही त्याने एका ओळखीच्या माणसाला दुकान सांभाळायला ठेवला होता. त्यांची काय ॲरेंजमेंट होती ती कुणालाच कधी समजली नाही. पण तो नोकर नसावा कारण तो आप्पाला काहीपण बोलायचा. सरळ तोंडावर बोलायचा. आतल्या बाजूला एक खोली होती. त्यात एक टेबल खुर्ची व दोन तीन लाकडी स्टुले ठेवलेली. आप्पा येऊन खुर्चीत बसला की पंधरा

मिनीटात, एक एक करीत तीन चार जण येत. स्टुले, टेबल जिथे जागा मिळेल तिथे बसून जात. मग आप्पाचा आवाज रस्त्यापर्यंत पोचे. गडगडाट हसणे असे. दुकान सांभाळणारा मन्या मात्र वैतागे.

"आप्पा! अरे अजून कायपण इक्री होवक नाय हा हां! जरा जपूनच चा पाण्याची आरडर दी. तुझ्या खिशात पैशे असले तर दी बाबा तुका होई ती आरडर. माझा काय जाता?"

या वरच्या वाक्यातही आप्पाला एक दोन शिव्या गेलेल्या असायच्या.

"बगतय मी कायता. सगळ्यांच्या पुढयात माझी लाज कसली काडतं? माका काय करूचा ता सांगता. बरा चार चा सांग नी दोन प्लेट भजी." आप्पाच्या या प्रत्येक वाक्याच्या सुरवातीला किंवा शेवटी अत्यंत झणझणीत खास कोकणी शिव्या असायच्या.

आप्पाच्या दुकानाचा फायदा तोटा किती याचा ताळेबंद ब्रम्हदेवाला तरी जमला असता का? हा मोठा प्रश्न आहे.

दुसरी महत्वाची व्यक्ती म्हणजे आप्पाचा मामा. त्याला सगळी बाजारपेठ मामा आचरेकर म्हणूनच ओळखायचे. आप्पा आणि मामाचे नाते हे मात्र मामा भाच्या सारखे कधीच नव्हते. त्यांच्या वयात फारसा फरक नसल्यामुळे ते अगदी मित्रासारखे गळयात गळे घालून रहात.

मामालासुद्धा सराईवर चार पैशे आले की धंदा करायची खुमखुमी यायची. मामा अगदीच खेडेगावात राहाणारा. त्यामुळे त्याचा पेहेराव पण खास असायचा. खाकी हाफ पँट, त्याच्या आतमधे पट्टया पट्टयाची चड्डी, वर गंजी फ्रॉक नायतर बंद गळ्याचा पांढरा कुडता. डाव्या खिशात चंची आणि एक तो रुमाल म्हणत असलेला कपडा. हा रुमाल पहिला सफेद होता असणार. पण कोकणाच्या लाल मातीच्या पाण्यात कायम धुतला गेल्यामुळे पिवळट, गुलबट, मातकट, मळकट असे कोणतेही विशेषण लावले तरी चालेल असा होता.

उजव्या खिशात एकादी दोन, पाच रुपयाची नोट आणि कांही खुर्दा असायचा. मामा गावावरून आला की पहिला आप्पाच्या दुकानात हजेरी लावे. मग कितीतरी वेळ हसण्याचा गडगडाट चालू असे. जाता जाता मामा चंची उघडूनच बाहेर येत. बाहेर निरनिराळे तंबाखू लाकडाच्या पेट्यात ढीग लावून ठेवलेले असत. त्यातला आपला खायचा तंबाखू चंचीत भरत. माप नाही, वजन नाही, भाच्याचे दुकान म्हणून हिशोबही नाही. वर मन्याला सांगायचे.

“अरे तो काळो तंबाखू वायच बांधून दी रेss. मशेरीक होयो.” मन्या जरा मागे पुढे होई. मग मामाचा आवाज चढे. शेलकी मालवणी शिव्यातून तो नोकराची आरती उतारे. आणि शेवटचे वाक्य जाई, “तुझ्या बापसाचा हा काय रे दुकान? भाच्याचा हा

माज्या. तो काय बोलता काय? दी बांधून.” तेवढयात आप्पा बाहेर आलेला असे, मन्याला सांगे.

“दी रे तेका तंबाकू, माजा दिवाळा नाय काडूचो तो. कदी लागलेच पैशे तर मायेन देतलो तो. XXXचो मामाच लागता रे माजो.” मग गडगडाट हसत म्हणे.

“काय मामा खरा की नाय? देशीत ना माका पैशे कदी अडचणीत आलय तर?”

मामा मग हसत पायऱ्या उतरत बोले, “पैशे वसुलीचा रिजर्वेशन करता माज्याकडे, तू कशाक अडचणीत येशी! माझ्या चौपट इस्टेट हा तुज्याकडे. भाचो म्हणून कायमाय मायेन करतय इतक्यातच.”

बेहिशोबी कारभार पण कधी भांडण तांडण नाही. वेळ मिळाला की दोघांचाही दंगा सुरू असे. आप्पाच्या घरी मैफील जमे. रात्री आठ वाजताच जेवून सगळे मोकळे होत. मग आप्पाची आई म्हणे.

“अरे सोन्या! आज कायतरी देवा धर्माची गोष्ट सांग रे! तुजा किर्तन चांगला असता.”

“गे कोणी सांगल्यान तुका? ह्यो वडाची साल वांग्याक लावन कायय गोष्ट रचता नी तुका सांगता. हेणी पुराणातल्यो गोष्टी वाचलासान तरी?” गडगडाट हसत आप्पा मामाला टोला मारी.

“असांदे बरी असता तेची गोष्ट. देवांची नावातरी कानार पडतत. नायतर तू. कधी देवाक पाया पडतस काय रे? रवांदे, सोन्या तू किर्तन सुरू कर झोपाक उशीर होयत नायतर.”

मग सोन्या उर्फ मामा किर्तन सुरू करे. आप्पाची माहेरपणाला आलेली बहिण त्याला रोवळी व दांडा आणून देई. आप्पा राजापूरी पंचा आणून देई. इघडा बंब मामा मग पंच्याचा पट्टा करून डोक्याभोवती गुंडाळे. रोवळीत दांडा उभा करून तुणतुण्याची नक्कल करे. असे ते तुणतुणे ‘ट्यांयSS ट्यांयSS’ असा तोंडानेच वाजवून सूर पकडल्याचे नाटक करी.

आप्पा ओरडे “लागलो रे लागलो सूर! पुढे चालू कर!”

मग गोष्ट सुरू होई. आज राम, लक्ष्मण आणि सीता वनवासात फिरतायत आणि रावण सीतेला पळवायसाठी आलेला आहे, इथून गोष्टीला सुरवात होते. राम, लक्ष्मण, सीता कोणाचेही नांव आले की आत्या दोन्ही हात जोडून डोके पुढे नमवते आहे. मधेच मामा ट्यांय SSS ट्यांय SSS करून तुणतुणेही वाजवून घेतो आहे. अर्थातच मामा कधी आजूबाजूच्या गावा खेरीज कुठे बाहेर

फिरलाच नाही. त्यामुळे दंडकारण्य म्हणजे शेजारीच असलेल्या गोठवण्याचे डोंगर. शरयु नदी म्हणजे गडनदी असे. रावण वरवड्याच्या सीमेवर दडा धरून बसलेला असे. आणि सर्वात मजेशीरपणा कथेत यायचा तो जवळपासच्या गावात घडलेल्या एकाद्या घटनेने. कुठल्यातरी चाकरमान्याची बायको गावी कामात हातभार लावण्यासाठी मागे राहिलेली, कुणाबरोबर तरी पळून गेलेली असे. आणि ही गोष्ट दहा गावात वाऱ्यासारखी पसरून गाजत असे. तो चाकरमानी रामाची जागा घेई, त्याच्या गावचा शेतकरी भाऊ लक्ष्मण असे. आणि पळवून नेणारा रावण असे. गोष्ट रामायणाची, पण घडत असे आत्ताच्या सत्य घटनेवर. असे आख्यान म्हणजे, पौराणीक, वर्तमान, विनोद, थापा, अशा सर्वांचा कोकणी दहिकाला बनलेला असे. पण तो प्रत्येकाला आनंद देऊन जाई.

मामा बहीणीला देवनामाचा आनंद देत. आप्पा वर्तमानातली सत्य गोष्ट ओळखून मधे मधे मामाची टर उडवत पात्रांची खरी नांवे उघड करण्याचा आनंद लुटे. आप्पाची बहिण “म्हणजे काय?” “म्हणजे कोण?” करीत आश्चर्यात आणि विचारात बुडलेली असे. गोष्टीच्या शेवटी साक्षात्कार झाला की ओरडे, “समाजला रे माका मामा! कोणाची गोष्ट ता.” एवढे बोलून खो खो हसत सुटे. मग वर शेरा देई. “काय पण मेलो मामा रंगवता एक एक भानगडी.”

असे कायम एकमेकाना आनंद देत जगणारे मामा, भाचे एकत्र घुमाकूळ घालत असत.

एका सराईवर सगळेच पीक चांगले आले. मामाच्या अंगात व्यापार करायची खुमखुमी येऊ लागली. तालुक्याच्या फेऱ्या वाढल्या. आप्पा बरोबर व्यापाराच्या गोष्टींची शिखर परिषद भरू लागली. आणि एक दिवस मामाने आचऱ्याहून दहा पंधरा पोती नारळ भरून आणले. आप्पाला म्हणाला, “आप्पा नारळ आणलंय, दुकान नाय. तुझ्या दुकानापुढे लाव काय रे?”

“आता ह्या झेंगाटच झाला रे मामा! पण काय करतलं आता लाव बापडो.”

मग तंबाखूच्या थोडया पेटया सरकवून जागा केली गेली. थोडा रस्ता अडवला गेला. मामाचे नारळाचे दुकान आप्पाच्या दुकानाचा बराचसा भाग अडवून सजवले गेले.

नारळ पाहून आप्पा म्हणाला, “ह्या काय रे. मामा! शिरपिके नारळ बघून नाय आणायचे? हे सगळे पांढरे फटक कोवळे नारळ. सडतले नाय चार आठ दिवसात? तुका मामा बनवल्यान रे सुखठणकरान. अरे बाजारात कोणाकडे तरी असले नारळ आसत काय? ”

“माशाचा कालवण काय छान होयत. उडयो पडतीत बघ. चार दिवसात दुकान खाली होयत.”

आकारा प्रमाणे नारळाचे ढीग लावले होते. तीन आणे चार आणे व पाच आणे अशा तीन प्रकारच्या ढीगात चार पोत्यातले नारळ विभागले. आणि मामानी दुकानाच्या बाजूला दोन भक्कम चिरे लावून आपली बैठक तयार केली.

बाजारात वर्दळ सुरू झाली. दोन चार लोक भाव विचारून गेले. एक दोन लोकानी भाव केला. पाच आण्याचे नारळ चार आण्याला मागायचे. मामा नाय म्हणाला तर पुढे चालू लागायचे. असे झाल्यावर मामाने व्यापारी विचार केला. कोणी भाव करायला सुरवात केली की सांगायचा “चार घेतलंस तर देयन तुज्या भावान. एक दोन नारळाक भाव करुचंय नाय”

तीन दिवस मामा दुकानावर बसत होता. दुपारी आप्पा त्याला जेवायला म्हणून घेऊन निघायचा. ढीगातून दोन नारळ उचलायचा. मामाला म्हणायचा, “चल मामा, जाता जाता मासे घेवया. दोन नारळ घेतलंय. चांगला मकमकीत कालवण बनवूक सांगूया आईक.” मामा आनंदून जायचा म्हणायचा “होय रे तुझ्या आवशीच्या हातचा कालवण म्हणजे अप्रतिम. घासलोटाच ता चार उंडयो भात जास्तीचो जाता पोटात.”

भाच्याने नारळ फुकटात उचलल्याची खंत नाही. नफा तोट्याचा हिशोब नाही. फुकट तंबाखुच्या बदल्यात नारळाने हिशोब अनवधानाने भागवलेला असे. पण मन माशाचे कालवण व भात यात गुंतवून ही जोडी घराकडे परते.

असे आनंदाचे सुखाचे चार दिवस गेल्यावर मामाला गावच्या कामांची आठवण होई. तो पर्यंत पाचएकच पोती कमी झालेली असत. "आप्पा पाचच पोती खपली रे. आता?"

"खपतीत! खपतीत! बस तू अजून चार दिवस. रोज माशे खावक गावतसत. सोमवार सोडलो तर रोज खातसव ना रे? रव तू अजून चार दिवस."

"नाय रे कामा आसत. जावचा लागात."

"कित्या मामीची आठवण ईली काय रे?" जिभेला हाड नसलेला भाचा मामाला बिन दिक्कत विचारायचा.

"नाय रे गाय ईवक झाली सा. ता निस्तरूचा काय तुज्या मामीक जमातसा वाटणा नाय. नी खरवस घेवन येतय ना तुज्यासाठी."

मामाने नारळाचे दुकान भाच्याच्या आणि पर्यायाने त्याच्या नोकराच्या हाती सुपुर्त करून गावची बस पकडली. चार दिवसांत नोकराने पटापट नारळ विकायला सुरवात केली. सहासात पोती

त्याने रिकामी केली आणि मामा परत आले. नारळ पटापट संपलेले बघून खूष झाले. नोकरा कडून हिशोब घेतला तर पैसे कमी वाटू लागले. नोकराला विचारले, “अरे एवढेच?”

“मग मी काय खाल्लंय? वो कोवळे नारळ ते. भाव खंय पकडून ठेवशात. लागले काय सगळाच नुकसान. ते बघा धा पंधरा लागलले नारळ बाजूक काढलंय. दर उतरून फटाफट ईकलय तेचा कायच नाय! नी वर ईचारतत पैशे कमी कशे म्हणान.”

कुठल्याही साध्या प्रश्नाचं उत्तर सरळपणे मिळणे कोकणात शक्यच नाही. कमालीचा तिरसकपणा असला तरी कोणाचे नुकसान करण्याची वृत्तीही नाही. मामांपेक्षा मन्याला व्यापाराची समज नक्कीच जास्त होती. कारण दुपार पर्यंत नव्या पोत्यातले आणखी आठदहा नारळ लागलेले व देठाकडे बुळबुळीत झालेले निघाले. मग काय करायचे याचा...दुकानासमोरच मामा भाच्यांचा विचार विमर्श सुरू झाला आणि आलेली दोन चार गिऱ्हाईके ते ऐकून नारळ न घेताच परत गेली.

मग नोकर ओरडला “वो आत बसून काय ता बोला. गिऱ्हायका पळून जातत बघा तुमचा बोलणा ऐकान. नायतर असा करा मामानु, सगळे नारळ घेवन गावाक जावा. जाताना शेर दोन शेर लसूण घेवन जावा. नी नारळ खवन सुकवून चटणी करून आणा. पाच पाच तोळ्याची पाकीटा बनवून आणा. सगळी ईकान देतय

की नाय बगा. वो लसणेच्या भपकाऱ्यात लागलेल्या खोबऱ्याचो वास दडान जाता. चांगली झणझणीत बनवल्यार झटकन खपतली बघा.''

मघाशी भडकलेला नोकर आता संकटमोचन मुरारी बनून आला होता. मामा आणि भाचा दोघेही नोकराकडे आ वासून पहात राहिले होते. आणि ''मामा आचरेकरांची लसणीची खास चटणी जन्माला आली, पाकीटबंद झाली. व भाच्याच्या दुकानात सजली.''

धंद्याचा ताळेबंद निघू शकला नाही पण सुखठणकराचे साठ रुपायाचे देणे मामाच्या डोक्यावर चढले.

''मामा तू तर बुडतलं पण माकाय बुडवतलं काय रे'' म्हणत ते पैशे भाच्याने हप्त्या हप्त्याने सुखठणकराला भागवले.

चार महिन्यानी मामाला पैशे भागवल्याचे समजले. तो आप्पाला म्हणाला, ''देयन सरायवर तुजे पैशे. पीक चांगला येवक होया.''

आप्पाचाय धंदा असाच चालायचा. दुकानात आलेली तूट तो शेतीच्या उत्पन्नातून भरायचा. मामा देखिल तेच करायचा. पण नुकसानाचे दु:ख यांना कधीच चिटकले नाही. एकमेकांच्या नुकसानाची खिल्ली हे स्वत:च उडवत. तसे एकमेकांचे नुकसान

भरतही असत. सरळ व्यवहार यांना कधी चिकटला नाही. हा धंदा करायचा उपद्व्याप मात्र अव्याहत चालूच राहिला. नुकसानाचा आनंद मामा भाचे, एकमेकांची खिल्ली उडवत पुरेपूर लुटत राहिले.

कायद्याचे ज्ञान यांना कुठून मिळायचे देव जाणे. पण सगळ्या कायद्यांची माहीती अगदी खोलवर. त्यातल्या पळवाटा वकिलांच्या अगोदर हे शोधून काढत. १९५३ सालचा जंगल सरकारी करण्याचा कायदा असो, की नंतरचा कसेल त्याची जमीन हा कूळ कायदा असो. यांनी आपल्या जमिनी वाचवल्या. डोंगर जंगलात जाऊ नयेत म्हणून तलाठ्या कडून जंगल जमिनीचा सात-बारा वरकस-पड जमीन म्हणून आधीच फिरवला. कुळाना जमीन जाऊ नये म्हणून कुटुंबातच इतरांच्या नावे वाटप केले. विधवांच्या जमिनीला कुळकायदा लागणार नाही म्हणून त्यांच्या नावे वाटपात जास्त जमीन ठेवली. तसे रीतसर स्टँप पेपर बनवले. कांही कुळाना चुचकारुन समजावून तीन तीन वर्षापूर्वीचे सातबारा, तलाठयाला खिशात चिरीमिरी घालून आपल्या नांवे करवून घेतले. आजूबाजूच्या गावातल्या जमीनदार वतनदारानाही बोलावून येणाऱ्या कायद्यांची माहिती दिली. आणि त्यांचीही वाटपे कशी करायची. स्टँपपेपरवर काय लिखाण करायचे, तलाठ्याला कसे समजावायचे ही मदत पैसे घेऊन करू लागले. यांची फी वकीलांच्या अर्धी होती. त्यामुळे गर्दी यांच्याचकडे जास्त.

आप्पा स्टँप लिहीण्यात कच्चा, पण मोठा वतनदार चार गावात जमीनी पसरलेल्या, म्हणून ओळखी जास्त. तो लोकाना पकडून आणी. मामा स्टँप पेपर लिहीत. चार पांच महिने हा प्रकार जोरात चालला. आजूबाजूच्या तलाठयांच्या पोटात किती कांदाभजी, चहा आणि कोंबडया गेल्या याचा हिशोब कुणी केला नाही. खिशातही चार पैसे गेले आणि त्यांनी खुशीने मामा भाच्यांचे काम करून दिले. मामा भाच्यांची दुक्कल दहाबारा गावात ओळखू जाऊ लागली. पुढे कित्येक वर्षे मामांकडे मग स्टँप पेपर रायटर म्हणून वेगवेगळ्या केसेस येऊ लागल्या आणि खिशात चार पैशे राहू लागले. हा बिन भांडवली धंदा मामाना रास आला. मग आप्पाच्याही खिशात चार नोटा खेळू लागल्या.

पण मामांचा पेहेराव बदलला नाही. तंबाखू पैसे न देताच भाच्याच्या दुकानातून तसाच येत होता. आप्पाने आता तंबाखू बरोबर सोले, भेरंडेल, चटण्या असले कोकणी पदार्थ ठेवायला सुरवात करून तोटा वाढावायचा मार्ग सुकर करून, आलेल्या पैशाना जाण्याची वाट मोकळी करून दिली.

यांना पैशानी उजळपणा चढवला नाही, की तोट्याने दुःखी केले नाही. सदा कांही ना कांही गोष्टी करत हे गडगडाट आवाजात हसतच असत. कोण होते हे वैरागी, विरक्त, संत? कुठलाच प्रकार

कितीही विचार केला तरी यांना लागू पडत नव्हता. लागू पडत होता तो एकच एक ! “अस्सल कोकणी माणूस”.

अशी ही दुक्कल हुशारीने परीपूर्ण पण व्यवहाराने..... न बोललेच बरे.

केव्हा केव्हा संभाषण ऐकू येई. “मामा तू खंय शिकल रे इतक्या लिवक?”

“तुजो मामा नॉन-मॅट्रीक पास हा. म्हायत नाय?” मॅट्रीक पर्यंत पोचून शाळा सोडलेला मामा स्वत:ला नॉन मॅट्रीक पास ही पदवी बहाल करीत असे आणि स्वत:च गडगडाट हसत सुटे.

कायद्याचे छोटे मोठे सल्ले दोघेही अगदी अचूक देत. एके दिवशी एक मुलगा आप्पाच्या दुकानात आला आप्पाबद्दल विचारू लागला. आतून आप्पा जोरात ओरडला, “कोण रे? आत ये. आसय मी.” मुलगा आत आला. म्हणाला, “आचरेकरानी सांगीतल्यानी तुमका भेटूक. ओळख होई प्रांताची (डेप्युटी कलेक्टर)”

“कित्या रे?”

मग त्या मुलाने सविस्तर हकीगत सांगीतली. त्याला चांगले मार्क मिळाले होते. कोल्हापूरला शिकायला गेला होता. त्याला डोमीसाईल सर्टीफिकेट हवे होते. कोल्हापूरच्या दोनच वर्षाच्या

वास्तव्यामुळे तिथल्या डेप्युटी कलेक्टरने त्याला नकार दिला होता. वर सांगीतले होते. तुमचा जिल्हा रत्नागिरी तिथे जा आणि घ्या सर्टीफिकेट. हा रत्नागीरीला गेला तर डेप्युटी कलेक्टर जिल्ह्याचा दौऱ्यावर. आज तो या तालुक्याच्या गावाला भेट देणार होता. आप्पा ताडकरून आपल्या जागेवरुन उठला. म्हणाला, "चल! चल लवकर! मामलतदार कचेरीत जावक होया. थयंच असतलो तो. बघतयच मी कसो देयत नाय तो."

हे ऐकून पोरगाही हुशारला. झपझप चालले तरी मामलतदार कचेरीत पोचायला पंधरा मिनीटे लागली. आत शिरता शिरता आप्पाने प्यूनकडे चौकशी केली, "काय रे प्रांत ईलोसा काय रे?"

"होय! होय ! इल्ले खरे अकरा वाजता, तास भर होते. पण गेले. ते नी मामलतदार खंयतरी. केवा येतीत ता काय म्हायत नाय. पण हेडक्लारकाक इचारा." आप्पा हेडक्लार्ककडे वळला. त्याला विचारताच त्याने उत्तर दिले. की ते परस्पर रत्नागीरीला जाणार ऑफिसला येणार नाहीत.

आप्पा चक्रावला दोन चार शेलकीतल्या शिव्या घालत बाहेर पडला. एकादे काम अंगावर घेतले की तडीला लावल्याशिवाय गप्प बसेल तर तो आप्पा कसला. त्याचे विचार चक्र सुरू झाले. थोडा वेळ गाढ विचार केल्यावर त्याने त्या मुलाला विचारले.

“काय रे कोल्हापूराक तू कोणाकडे गेल्लं?”

“डेप्युटी कलेक्टरच्या ऑफिस मधे.” .

“अरे! तेच्या वरचो तेचो बापूस कोण म्हायत आसा? कलेक्टर! कलेक्टराक पावर आसा तुका सर्टीफिकेट देवची. तू थयंच जा आणि कलेक्टराक अर्ज दी. मी अर्ज लिवन देतय तुका. हयथय फिरत रवान पैशाची नासाडी करू नको.”

“पण मी तेवढे पैसे घेऊन नाय आलो.”

“अरे तुका मामान पाठवल्यान ना. मी देतय तुका.”

मग आप्पाने अर्ज लिहीला. कचेरी बाहेर बसलेल्या रायटर कडून तपासून घेतला. आणि त्या मुलाला दिला. खिशात हात घालून पाहिले तर बारा रुपये निघाले. दहा रुपये मुलाला देऊन म्हणाला, “आत्ताच कोल्हापूराक जा! काम होतला बग तुजा. धा रुपये आसत. बसचे तीन जावचे, तीन येवचे, नी चार रुपये वर. खूप झाले जेवचे खावचे. भागतला तेवढयात.”

“पण मिळेल ना मला सर्टीफिकेट?”

“अरे! मी लीवलसय अर्ज. देवचाच लागात कलेक्टराक. काय भितास रे तुमी लोक. कलेक्टर असलो तर काय झाला? आपली कामा करुकच बसवलान ना सरकारान तेंका? जा सर्टीफिकेट मिळाला काय माका सांग नी मगच गावाक जा परत.”

चार दिवसात हसत, नाचत तो आप्पाला भेटायला आला. आप्पा जाम खुष झाला.

आप्पाला कायदे, रेव्हेन्यु व्यवस्था, तिचा उपयोग करून घेण्याचे मार्ग एवढे कसे माहिती याचे आश्चर्य वाटे. कोकणी लोक शिकले नाहीत तरी कायद्याचे त्यांचे ज्ञान वकिलाला लाजवेल असेच असते. आप्पा आणि मामा यांना दुसरी खोड होती. कायदेशीर कामांची कोणाला अडचण आली तर त्याचे ते काम स्वत:च्या खिशाला चाट लावून पण करीत. काम झाले की हंसत सगळ्या गावाला सांगत फिरत. सांगण्याची पद्धतही खास टेंभा मिरवण्या सारखी असे,

“अरे! xxxxचा काम होता ना कलेक्टराकडे, लिवन दिलय अर्ज, घातलंय कलेक्टराक घिस्सो. कायदो दाखवलंय. नाय कसो म्हणतलो. पयल्या झटक्यात केलान ना रे काम.” आणि मग गडगडाट हसणे. दुसऱ्यासाठी गाठीचे पैसे खर्चून ते हा कायद्याचा आनंद, परमानंदा सारखा उपभोगायचे.

यांची एकादी केस मामलदार पुढे किंवा दिवाणी कोर्टात चालू असेल तर हे वकीलालाच काय बोलायचे ते समजवायचे. सगळे समजावले की वर खास कोकणी वाक्य जायचे. “सांगीतलेल्याच्या भायर, भितुर काय बोलू नको. तुजा पुस्तकातला ज्ञान हय चलाचा नाय.” वकीलाला ही रसायनं बरोबर माहीत होती.

हे मामा भाचे रेव्हेन्यु डिपार्टमेंटच्या बदल्या, कलेक्टर कचेरीतल्या बदल्या यांचा मागोवा घेत असत. नवा बदली होऊन आलेला मामलतदार, डेप्युटी कलेक्टर एवढेच काय साधा हेड क्लार्क या सर्वांची ताबडतोप ओळख करवून घेत. नवीन आलेल्या त्या हुद्धेदाराला भाडयाने घर मिळणे ही पहीली गरज यांनी केव्हाच हेरलेली असे. जुन्याची बदली झालेली ऐकली की हे नवीन येणाऱ्यासाठी जागा हेरून ठेवत. हेडक्लार्कला गाठून निरोप सांगत, “नव्या सायबाक जागा होईतर सांग रे माज्याकडे छान जागा आसा. भाडाय जास्ती नाय. पाणी आणि मोठा म्हणजे परसात संडास बांधललो हा. उगीच हयथय फिराक नको म्हणून सांगतय रे! सायब काय तुमच्या आमच्या सारखो सकाळी उघड्यार रानात जातलो?” कित्येक गोष्टी बोलण्याची जरुरी नसतानाही मुद्दाम शेवटचा तीरकस शेरा यांनी मारून घेतलेला असे.

नवा साहेब यायचा. हिकमती करून हे यांनी ठरवलेली जागा त्याच्या गळी उतरवायचे. मग त्याचा घरी जाण्याचा रस्ता मामाच्या खोली समोरून किंवा आप्पाच्या घरावरून जाणारा असायचा. यातही त्यांचा बेरकेपणा असायचा. कसा? तो बघाच.

एकदा मामाची एक टेनन्सीचा केस मामलतदारसमोर आली. मामलतदार दोन महिन्या पूर्वीच आला होता. त्याची रहायची सोय मामानीच केली होती. एक दोनदा घरी जाता जाता, त्याला सहज

दृष्टीला पडला, म्हणून खोलीत बोलावून कांदाभजी आणि चहाचा प्रोग्रॅम करून टाकला होता. आपल्या केसबद्दल तोंडातून ब्र देखिल काढला नव्हता. केस बाबतची दरखास्त स्वत:च लिहून वकीलाला सही करायला लावून फाईल केली होती. तारखेच्या दिवशी मामा आपल्या नेहमीच्या पेहेरावात खाकी पँट आणि गंजीफ्रॉकात मामलतदार कचेरीत हजर झाले. बाहेर बसून होते. मामलतदाराच्या नजरेला देखिल न पडण्याची खबरदारी त्यांनी घेतली होती. नांव पुकारले तसे हे मामलतदारसमोर हजर झाले. मामलतदार यांना बघून चमकला. यांची केस असून, ओळख असून या माणसाने कधीच आपल्याकडे विषयही काढला नाही हे पाहून मामलतदारला एकदम आदर वाटला. त्याने "नांव सांगा" वगैरे सर्व वगळून विचारले, "काय केस आहे बोला?"

"सरकार काय नाय! वकिलान दरखास्त लिवन दिलान त्यात काय ता लिवलासा. आमी काय शिकलेले नाय. जमीनदारी गेली. थोडी जमीन रवलीसा. आता ह्योय तुकडो गेलो तर खायचा काय? सरकार! म्हणून दरखास्त दिली हा. समोरच्या पार्टीकच ईचारा खरा की खोटा ता." गरीबाईचा, अशिक्षित असल्याचा, नाडले गेल्याचा अस्सल संमिश्र अभिनय मामा करायचे.

मामलतदार दरखास्त वाचून समोरच्याला प्रश्न विचारू लागायचा. त्याच्या वकीलालाही प्रश्नानी भंडावून सोडायचा.

मामांच्या वकिलालाही एक दोन प्रश्न विचारायचा. उभ्या जागी न्याय जाणीते मामा आचरेकर समजून जायचे. केस जिंकली. आता संपत आलेले असायचे मामलतदार निकालाची पुढची तारीख द्यायचा. आणि मामा आपल्या खास तऱ्हेने नमस्कार करून बाहेर पडायचे. वकील बाहेर यायचा. मग मामा त्याला विजयी मुद्रेने सांगायचे "बघीतलंस केस कशी जिंकतत ती! फक्त तुजो पुस्तकातलो कायदो चलत नाय. सायबाक खेचून खिशात टाकूक येवक होया."

अशा कित्येक केस कोर्टात चालू असत. जास्त करून जमिनीच्या, कुळकायद्याच्या असत. केस कोणावर घातली तरी यांचा कोणताही आकस समोरच्या वर नसे. केस संपायच्या आधी भेटला तर "ये रे वायच चा पिवया" म्हणून बोलवीत असत. वर हंसत हंसत सांगीत "तुझो वकील तुझा वाटोळा करात रे. वायट वाटता माका. पण काय करणार बापदाद्यांची जमिन ती. अशीच कशी सोडतलंव."

केस यांच्या बाजूनी झाली की मात्र मजा येई. त्याला बोलावून हे सांगत.

"बघ हरलंस ना? आता काय खाशीत? वायट वाटता रे आमकाय. पण काय करणार बापदाद्यांची जमीन वाचवुकच होई ना रे. पण आता सांगतय ता आयक, जमिन माझ्या नावार रवतली.

पण तू पयल्या सारखी करीत जा. खंड तीसरो हिस्सो होतो तो चौथोच दी. नायतर खाशीत काय रे? पयल्या सारखोच रव. उगीच खंय कोर्ट कचेरी करतंस?" ही सोय दोघानाही पटे. मग मग तर कित्येक कुळानी असेच खटले चालवून, हरून हीच कुळाची प्रथा चालू ठेवली जी दोघानाही सोयीस्कर वाटे. कूळकायदा कागदावरच राहीला होता. कायद्याला कायद्यानेच हरवून दाखवण्याची किमया या दुक्कलीने केली होती.

मैत्री करण्याचे असले प्रयोग कोर्टातले जज्ज, पोलिस इन्सपेक्टर अशा जवळजवळ सगळ्याच हुद्देदारांवर करून यांनी त्यांना खिशात टाकलेले असे. यांची कामे कधी अडली नाहीत पण इतरांची कामेही यांनी हिरीरीने करून दिली होती. कोणीही अचंबा करावा अशी ही दुक्कल कायम आनंदाने हंसत फिरत असे. जाता जाता लोकांची खिल्ली उडवत असे. पण त्या खिल्लीत मनाचे दारिद्रय नसे. ऐकून कुणालाही हसू फुटावे आणि ज्याची उडवली असेल तोही त्यात हंसत दोन चार शिव्या घालून सहभागी होत असे. असले प्रकार करायला यांना फार मजा येई.

कोकणात दहिकाल्या बरोबरच कांही जणाना एकादे नाटक बसवायची हुक्की येई. नाटक संगीतच असले पाहिजे असा ठराव होई. मग भजनी गायक लोक आपआपले पात्र ठरवून घेत. नाटके सुद्धा भारीतली घेत. संगीत सौभद्र, मानापमान असले. आप्पा

आणि मामा या दुकल्ली पर्यंत ही बातमी पोचे. मग कोण कुठला पार्ट करणार याचीही बातमी पोहोचे. आप्पा रिहर्सल बघायला मधून मधून डोकावे. मग एक एकाची खिल्ली घ्यायला सुरवात होई.

या कंपूतला मेन पार्टी बाजारात तंबाखू घ्यायला आला की आप्पाला चेव चढे.

“काय रे खंयचा नाटक घेतलास रे? मानापमान? मग तू कोण?”

“मेन पार्ट हा. धैर्यधराचो.”

“होय मग गाण्याची प्रॅक्टीस चालू केलंस की नाय? नरडा चांगला होया रे!” आप्पाने गळयाला नरडे म्हणून हात धुवून घेतले व साव बनून विचारले, “अरे पण भामिनी कोण?”

“गुरवाचो संतो. तेचोय गळो बरो हा, नी गाताय चांगलो.”

“संतो? अरे तेका भामिनी बनवूक मेकअपचे किती थर लावतलं रे? तरी सुद्धा मधसुनच काळेपण डोकावतलोच ना? करा बाबानु, करा तुमका वाटता तसा. गावचा नाटक आसा. आजूबाजूच्या गावातले लोक येतीत. हसा होवचा नाय एवढा बघा.” असा अनाहूत सल्ला देऊन आप्पा निघायचा.

दुकानावर पोचला तर मामा आलेला असायचा. वाट बघतच असायचा.

......

आप्पाने मामाला बघताच एकदम सुरू केले. “मामा पुढच्या महिन्याचा शेवटच्या हप्त्यात कसला काम काढू नको हां. घरच्या सगळ्यांका घेवन ये. नाटक आसा. संगीत मानापमान. सुताराचो रामो, भजना छान गाता तो, तो धैर्यधर होतलो. नी गुरवाचो संतो भामिनी. म्हणून सांगतय.”

“असा म्हणतंस मग येवकच होया. काय रे आप्पा, शिटी, दोरे, गाठल्यांचा दुकान लाव काय रे?” मामाच्या अंगातला व्यापारी जागा झाला. पण आप्पा काळजीत पडला म्हणा, की घाबरला म्हणा, एकदम म्हणाला, “नको रे बाबा, माझ्याकडे आता पैशे नाय तुजा नुकसान भरूक. आणि असतीत ते पैशे कनवटीकच ठेव पयल्या अंकानंतर च्या पिवक तरी होतीत.”

“असा म्हणतंस. बरा तर पण दुसऱ्या अंकानंतर तू पाजूक होयस हां चा.” हा हिशोब झाला खरा पण नाटकाच्या दिवशी प्रत्येक अंकानंतर चहाचा सगळा खर्च आप्पानेच केला वर म्हणाला, “मामा तू कशाक कनवटेक हात घालतस! मी आसय ना! आणि तसोय तू आमच्या गावात पावणो आसस.”

“मी कसलो पावणो अर्धे दिवस हय, अर्धे गावाक, असोच फिरतय मी. पण असांदे तू मोठो तालेवार वतनदार नी वर व्यापारी. कर कर तूच कर खर्च.” मग आप्पाच्या पाठीवर जोरदार थाप.

हे मामा - भाचा दोघेही असे जिव्हाळ्याचे संबंध ठेवून होते.

नाटक अत्यंत मन लावून पहायचे. गाण्यात गुंगुन जायचे. समेवर “हाऽ हाऽऽ हाऽऽऽ” करून दाद द्यायचे. कुठे गाणाऱ्याची चूक झाली चमकून पहायचे आणि तोंडातून निघायचे “ह्या चुकलो XXXचो.” हे वाक्य दोघांच्याही तोंडातून एकदमच येई. त्या भजनी मंडळीतल्या गायकांनी केलेल्या नाटकातले संगीत ते पूर्णानंदाने घेत व तृप्त होत. नाटकाचा विषय कमीत कमी दोन दिवस चाले. कोणी एकाद्याने नाटकाला नावे ठेवायला सुरवात केली की हे हसत हसत त्याची रेवडी उडवत. त्याला दोघेही दोन बाजूनी विचारायला सुरवात करीत.

“होय रे! तसा काय रंगूक नाय! तू इल्लंस? दिसाक नाय आमका तो?” आप्पा

“इल्लंय तर! पण नाटकात काय राम नाय म्हणून पयल्या अंकानंतर घराक ईलय.”

“होय? अरे! किती वर्गणी दिल्लं रे? वसूल नाय करायची?” मामा

"हो! मी वर्गणी देतलंय! हे कसले नाटाक करतले, भजनी ते."

"म्हणूनच रे! फुकटाच्या खंयच्याच गोष्टीची मजा गावत नाय." आप्पा

"पुढच्या येळेक चांगली पाच पंचवीस रुपये दी नी बग. सगळे अंक बगशीत नी गाण्यार नागासारको डोलशीत." मामा.

आतापर्यंत त्याला समजायचे, या मामा भाच्यानी आपली टेर घ्यायला सुरवात केली आहे. तो उठून जायला बघायचा. आणि आप्पा हो हो हसत सुटायचा. मामा त्याला म्हणायचे.

"बग रे आपल्याच गावचे पोरगे ते. ते करतत ता बगून तेंका टाळयो देवच्यो असतत. हौशेन मेहेतन करून बसवतत रे नाटक. थोडा पोटात घालूक शीक. नायतर हय काय बाळगंधर्व येतले रे?"

"आणि आले तरी तेंचा तिकीट परवडतला रे? माशासाठी पैशे नसले तर साठवणीतल्या सुकटाचा सार नी भात खातस ना? तसाच ह्येचीय चव घेवची सवय कर." आप्पा.

प्रत्येक गोष्टीतला आनंदच तेवढा वेचायचा ही सवय या दोघानीही अंगी बाणवली होती. फार मोठी गोष्ट होती ही. सहजा सहजी कोणाला जमेल अशी नव्हती. पण या दोघानी ती जमवली होती. आणि लोकानाही तसेच व्हायला सांगत असत. म्हणूनच कायम हसत खेळत असत.

...........

कोकणातली भुते, हडळी आणि देवचारांची हे समर्थपणे खिल्ली उडवीत. यांचा याच्यावर जराही विश्वास नव्हता. पण लोकांच्या विश्वासाला सुरुंग लावण्याची पद्धत ही खास कोकणी होती. कोयनेचा पहिला भूकंप रात्री साडेतीन चार वाजता झाला. सगळे गाव हादरले. लोक पळत रस्त्यावर आले. चार मिनिटात सगळे थांबले. आणि हळू हळू लोक आप आपल्या घरी गेले. दुसऱ्या दिवशी मात्र एकच विषय गावाला एवढे कोणी हादरवले? त्या काळी रेडिओ फार थोडया लोकांकडेच होते त्यामुळे नक्की कशामुळे गाव हादरले याच्यावर चर्चा सुरू झाली आणि देवचार, भुते यांच्यापर्यंत पोचली. मामांच्या खोलीवर वाडीतले लोक आले. आणि बोलू लागले. एक म्हातारा तावातावाने सांगू लागला. “भूतच आसा ता. हालवलान XXXच्यान सगळ्या गावाक.”

“होय? कोणाचा रे भूत?” मामा

“माका वाटता ती वरच्या आळीतली शिखडेकराची सून बाळंत होताना गेली ती काय! तिचाच भूत आसतला. बाळंतीणीचा भूत लय वायट. ईच्छा रवलली असता ना? म्हणून भूत होता.”

“होय? तुका दिसला काय रे तिचा भूत कदी?”

“होयतर! दोन म्हयन्यापूर्वी अमवाशेक भटाच्या घराकडे गेल्लंय. येवक रात पडली. वरच्या आळयेतल्या पांदणीत्सून भायर पडलंय तर समोर ही उभी. भियालय नी पळत सुटलय तो घराक येवन थांबलय. चार दिवस आंथरुणातच होतय. बेफाम तापान हैराण केल्लल्यान माका. तीच आसतली. सगळ्या गावाक हालवल्यान XXXन.”

“माका दाखवशीत काय रे? येत्या अमावाशेक येतय मी तुज्या बरोबर.”

“अशी काय दर अमवाशेक सांगून येतली? खंयय फिरता. भूत ता! असा बघान म्हटला तर काय पुढयात येवन उभ्या रवात काय?”

तेवढयात मामानी आपल्याकडचा रेडिओ चालू केला आणि बातम्या लावल्या. म्हणाले,

“आयक काय सांगतत ता. कोयनेक भूकंप झालो हा. तेणीच रात्री गावाक हालवल्यान. अरे खंयचा बाळंतीणीचा भूत घेवन बसलं! भुकंप तो. आणि त्या शिखडेकराची सून गरीब होती. वर तोंड करून कोणाशी कदी बोलूक, भांडूक नाय, तोंडारची मासकी कदी मारूक नाय. ती काय मेल्यार गावाक हालवतली?. सुधर जरा.” मामा आता त्याचा भुतावरचा विश्वास उखडून टाकायला पहात होते. तरी पण तो उठून जाता जाता बोलेच.

"कायव म्हणा! पण भूकंप काय अशेच होतत? भुताच ती सगळी एकठय होवन हालवतत गावाक. म्हणा तुमी भुकंप पण भुकंप करणारी भुताच आसतत ना?" आणि तो म्हातारा काठी टेकत निघून जाऊ लागे. मामा कपाळावर हात मारून घेत म्हणत, "वरचो उतरलो तरी ह्येंच्या मानगुटीर बसलंली भुता काय उतरवू शकुयो नाय रे बाबा!"

असा हा समाजातील अंधश्रद्धा काढायचा प्रयत्न करणारे समाजकर्तेही होते.

..........

तालुक्याला डॉक्टर होते. पण मामांच्या गावी डॉक्टर नाही. कोकणातल्या मरणाच्या पावसात नदी नाले तुडुंब भरले की गांवातून निघणे कठीण होई. पावसाबरोबर सर्दी, पडसे, खोकला, मोडोशी (फ्लू) असे सगळे पाव्हणे घरात घुसत. कुणी सर्दीने हैराण तर कुणी खोकत बसलेला. अंग मोडून ताप आल्याने कोणी अंथरुण धरलेले, असे चित्र घरा घरात असे. मग मामा धांवा धांव करायला सुरवात करत. त्यांच्या परसदारी सगळ्या औषधी वनस्पती लावलेल्याच असत. पहिल्या पावसा बरोबर त्या फोफावून वाढलेल्या असत. ते अडुळशाची पाने काढून काढा करायला ठेवीत. कोरफडीचा भाजून काढलेला गर गूळ घालून तयार ठेवीत. मग लोकांची हजेरी सुरू होई.

कुणाच्या “चेडवाक” नाहीतर “बायलेक” खोकला झालेला असे. कोरफड गुळाचे औषध ते देऊन त्याला सांगत.

“गळयात बोटान ह्येचो लेप कर. नी ह्यो अडुळशाचो काढो देतय. बाटली हाडलंस?” त्याने बाटली आणलेलीच असे. तो जाईपर्यंत दुसरा आलेला असे. कोणाचे पोट फुगून त्रास होत असे त्याला हिंग ओव्याची चटणी देत. कुणाला ताप असेल. तर डोक्यावर कांदे किसून घालायला सांगत वर त्यांनीच बनवलेली झाडांच्या सालींची पावडर असे. त्यात सातवीण, हरडा, आवळा, शेगलाचा पाला सुकवून कुटून ही पावडर बने. त्यांचे शास्त्र काय होते हे तेच जाणीत. पण लोक दोन चार दिवसात बरे होत. त्यांच्या गावच्या आसपास ते “मामा” नसत “आचरेकर वैद्य” म्हणून ओळखले जात. वर “तेंच्या हाताक गुण चांगलो” हे सर्टीफिकेट सर्वांकडून मिळे. ही फुकट सेवा असे. आप्पाची आई सुद्धा पावसा आधी त्यांच्या कडून ही औषधे मागवून ठेवी. मगचा संवाद मात्र मजेशीर असे.

“शालग्या तुका कित्याक गो वशेदा होई. हय डॉक्टर हा ना?”

“होय रे पण तुझी औषदा बरी. लवकर गुण देतत. डाक्टराचा कडू वशेद घेवक जीवावर येता रे!”

"गो पण आमच्या गावात डाक्टर नाय म्हणान मी काय तरी थातुर मातुर करतय. तेंका बरो करता तो वरचो." मामानी आकाशाकडे बोट केलेले असे.

"असांदे! तू पाठव माका वशेदा. आणि प्रत्येक पुडयेर लीव सर्दीचा, खोकल्याचा, हगवणीचा, तापाचा असा. म्हणजे ओळखूक बरा."

"गे! पण तुका वाचाक येता?" आप्पा.

"गप रव रे. लाज कसली काढतंस? तू नाय वाचणारो आसस?" आप्पा मग हो हो करीत हसत सुटायचा. मामा त्याला दम मारायचा

"आप्पा तेका शाळेत घालीन हा मी. लीवा वाचूक शिकवीन हुशार आसा ता. भयण कोणाची?"

आणि मग आईच्या शाळेवरून आप्पा आणि मामा एकमेकांची उडवू लागत. आणि आप्पाच्या आईलाही हंसू फुटे. असे त्यांचे सवाल जवाब चालत असताना ती मधेच बोले. "अरे मास्तराचा डोस्क्या फिरात माका शिकवताना. पयली शीरी काढूची लागता तीच येयत की नाय ता म्हायत नाय."

"शीरी न्हय गो शालग्या, श्री म्हण श्री."

"हां ताच तां."

“बग रे मामा! आता अशी ही तुझी भयण शाळेत घातलंस तर मास्तर पळान जातीत तेचा काय?” आप्पा

आता आप्पाची आई हा त्यांचा दंगा थांबवायला जोरात ओरडे. “गप रवा रे! पुरे झाला! चा होयो असात तर गप रवा.”

मग हळू हळू हा विषय बंद होई पुढच्या आठवडयात निरनीराळ्या रंगाच्या कागदात बांधलेल्या मोठया मोठया पुडया घेऊन मामा येई. व रंग आणि रोगाची जोडी जुळवून बहिणीला समजाऊन सांगे. सगळी दाखवून झाली की वर सांगे.

“गूळ थोडोच घातलंय गो शालग्या. तुझ्याकडे मध असताना, म्हणान. औषध देताना थोडा मधात कालवून दी.”

“झाला! मेलो मामा बहीणीकय देताना हात आखाडता बघ?” आप्पा मामाची खेचायला सुरवात करी.

या दोघांची आपसातही अशी मस्करी चाले. आणि हसण्याचा धबधबा चालूच राही.

कोकण्यांचे सगळे गुण घेताना या दोघानी अवगुण मात्र हळूच बाजूला सारले होते. कोणाबद्दल आकस यांनी मनात जपला नाही. कोणाला दुखावले नाही. कोणी अडचणीत दिसला तर त्याला पुढे पडून मदत केली, गावावर प्रेमच केले, होणाऱ्या नाटकांवर, दहिकाल्यांवर, किर्तनांवर कायम चांगलाच अभिप्राय देत आले.

गरीबीचा बाऊ करून कोणाची सहानुभुती मिळवायचा विचार यांना कधी शिवला नाही. आगाऊपणाने विधुरांच्या आणि घोडनवऱ्यांच्या जोड्या जुळवून त्यांच्या लग्नाचे बार उडवून दिले. जगले ते उत्सव करीतच जगले.

आता यांचा हाही एक उत्सव पहा.

.............

गावातले एकुलते एक डॉक्टर यांचे भाऊबंद. अगदी ओळखीतले. पण या दोघाना त्यांच्याकडे जायची वेळ कधीच आली नाही. मामांच्या खोलीच्या समोरच्या रांगेत त्यांचे घर होते. कधी मामांच्या खोलीवर आप्पा असेल आणि समोरून जाणारे डॉक्टर दिसले तर लगेच संवाद सुरू होत.

“ओ! डाक्टर या तरी हंय वायच!” आप्पा.

“नाय रे आप्पा दवाखान्याक जावक वेळ होयत” डॉक्टर.

“या! ओ! पेशंट काय रोजचेच. कांद्याची गरम भजी काढतलंव या खावन जा.” मामा.

कांद्याची भजी हा डॉक्टरांना सर्वात मोह पाडणारा पदार्थ. आपसूक डॉक्टर ओसरीत येऊन बसत आणि मग रोग आणि त्यावरचे उपाय, यावर मामा आणि डॉक्टरांची जुगलबंदी चाले. पण या सगळ्यात एक दिसून येई या दोघानाही लोकांचे वीक पॉईंट

बरोबर पकडता येत. त्यावरुन त्याची टिंगल टवाळी पण करीत पण ती कधीच लागट नसे.

डॉक्टर भज्यांचा आस्वाद घेत असताना मामा मधेच विषय बदलीत. आता त्यांचा बेरकेपणा चालू होई. डॉक्टर सावज बनलेले असे आणि मामा त्यांच्या भोवती जाळे पसरायला सुरवात करीत.

"काय वो डॉक्टर! धाकटोय झिल शिकाक भायेर गेलो ना आवंदा." मामा.

"होय दोघेय पुण्याक आसत. मोठो डॉक्टर होयत दोन एक वर्षात. आणि धाकलो पण जायत डॉक्टरीक असा वाटता."

"मग काय, या गावाक दोन दोन डॉक्टर गावतले.... पण तुमी घरात एकटेच. कसे रवतास हो?" मामा.

"काय देवाची ईच्छा! आपल्या हातात काय आसा. तिका जावन दोन वर्षा झाली. मीच करत होतय जेवाण पोरांसाठी. आता काय एकटोच, खातंय कायतरी करून."

"अहो असा कसा म्हणतास! देव फक्त अडचणी उब्यो करता. तेच्यार आपण मात करूची असता. तुमी मनात आणलास तर होयत काय तरी" मामा.

"म्हणजे मी नाय समाजलंय!" डॉक्टर

“ता तसा नाय येवचा लक्षात, मी येयन तुमच्याकडे नी समजावीन तुमका. नींवात वेळ होयो ना? घाय नाय चलत असल्या कामात. आता तुमची घाय आसा दवाखान्यात जावची.” मामा.

आप्पाला कांहीच समजले नाही. डॉक्टरनाही कांहीच उमजेना. डॉक्टर गेले. आप्पाने मामाच्या मागे भुंगा लावला.

“अरे! मामा काय सांगी होतस तू डॉक्टरांका? काय करतलं तेंचा? माकाय कळू दे!”

“काय नाय रे! अजून कायच नाय ठरला पण बघतय प्रयत्न करून. ह्या काम झाल्याशिवाय बोलूचा नसता कोणाकडे.” मामा.

“माकाय नाय सांगतलं काय रे?” आप्पा.

“तुका? तू तर वाजती घाट आसस. आता नाय, पण डॉक्टरांशी बोलान बगतय मग तुका सांगीनच.”

आप्पा जरा हिरमुसला आणि दुकानावर निघून गेला. पुढचे कांही दिवस डॉक्टर आणि मामा यांच्या गपचूप बैठकी होऊ लागल्या. मग डॉक्टर मामांच्या खोलीवर सारखे सारखे येवू लागले. मामानी हेरले सावज पूर्णपणे त्यांच्या जाळयात आले आहे.

एक दिवशी डॉक्टर आणि मामा दोघेही गावातून गायब झाले. चार सहा दिवसानी मामा आले. डॉक्टरही आले. पण डॉक्टरांबरोबर हिरव्याचुडूयातली एक बाईपण आली. स्टँडवरून

सगळे येताना आप्पा आडवा गेला. कसाबसा दुकानात पोचला. मामाचे करतुज त्याच्या ध्यानांत आले. खुर्ची खूप खुपू लागली. दुकानात बसवेना. तडक उठून मामाच्या खोलीवर पोचला. मामा आंधोळ करुन उघडाबंब अंग पुसत होता.

"मामा! अरे माका पाठी ठेवन एकटोच लाडू खावन इल रे? मनाक काय वाटला का नाय तुझ्या?"

"अरे! ओरडतस काय? दचाकलंय ना रे. पुसतय दिसत नाय. अरे टॉवेल निसाटलो तर?"

"विषय बदलू नको मामा! काय झेंगाट केलंस ता माका पयला सांग!"

"अरे कसला झेंगाट! डॉक्टर एकटोच. बायल नाय! पंचेचाळीशी संपली रे. आत्ता पन्नाशी येयत. बगणारा कोणतरी होया ना? मग लक्षात इला. आमच्या बायकोच्या नात्यात एक घोडनवरी हा. बापूस नाय, आयशेन धा वीस जणांकडे चेडवाच्या लग्नाचो विषय काढलो. पण ते आपली चेडवा खपवतीत की हेच्याकडे लक्ष देतीत? त्या दिवशी भजी खाता खाता ईचार इलो. डॉक्टराचा लगीन जमवुया. मग तीन चार वेळ डॉक्टराक भेटान सुतोवाय केलंय. पयल्यान नाय म्हणा होतो. पण मग उतावळोच झालो रे लगीन करूक."

“तूच तेका बरोबर फिरवलं असतलं. तुका सांगूक होया मामा? तू तर कोणाकय खंयच्याय घोड्यार बसवणारो. पण माका कित्या बाजूक ठेवलंस?”

“अरे तू वाजती घाट! नी शालग्याक, तुझ्या आयशेक, समजूक देवचा नव्हता. माझ्या बायलेच्या नात्यातली ना रे ती. आणि आमची बायल आणि शालग्या म्हणजे नणंदो-भावजयो. नकोच ता म्हटलंय. सगळा जमवून आणलला फिस्काटात. आठ दिवसात बार उडवून ईलय बघ.”

“होय रे पण बायल डॉक्टराक आवडली?”

“तर! अरे पोर चांगलाच हा. घरकाम सगळा करता. जेवाण छान करता. सोभावान गरीब हा. आणि काय होया. डॉक्टर सुखी होतलो बघ. वर्षात दोंद सुटला की समजायचा, बायको मानवली. नी वर्षात पोटुशी होवन बायल म्हायेराक गेली की समजायचा घोव मानावलो. बघ असाच होता की नाय ता.”

असामान्य आत्मविश्वासाने मामा आपल्या कर्तुत्वाचे समर्थन करीत होते. अगदी सरळ साधा सुखाचा मार्ग पण समजावत होते. आप्पा तो आत्मविश्वास बघून पहिल्यांदा दिपून गेला होता. तो जागा झाला.

“पण मामा माझे लाडू खंय? ते सोडतलंय नाय मी.”

“अरे हो तुझ्यासाठी पाच लाडू आणि चिवडो तुझ्या मामीन बांधून दिल्यासान. तेकाय म्हायत आसा. भाचो कसो हा तो.” दोन मिनीटे आप्पा गप्प झाला. मग एकदम् म्हणाला,

“मामा चल, कपडे घाल. डॉक्टराच्या घराक जावया. तू आसलस काय स्वागत बरा होतला. बगुया तरी डॉक्टराच्या बायलेक.”

“अरे एकारद्या दिवसाची तरी उसंत दे तेंका. तासभर नाय झालो येवन. जावया उद्या. तवसर तेंची बायल सगळा बघून घर व्यवस्थित लावीत. उद्या गेलंव तर शिरो, बिरो काय तरी चांगला गावात रे खावक.” मामा.

असे धोरणी मामा आपल्या अधीर झालेल्या भाच्याला समजावीत. उत्सव देखिल कसा वेळ काळ बघून करावा याचे ज्ञान देत होते.

आणि वर्षाने खरोखरच जेंव्हा डॉक्टरांची बायको आपले पोट सावरीत गावी निघाली आणि खरोखरच दोंद सुटलेले डॉक्टर तिला पोचवायला निघाले. तेव्हा आप्पाने मामाला साष्टांग नमस्कार घातला.

“मामा तू खरो आसस. लोकांचा भविष्य सुद्धा आता तुका समजाक लागला रे!” मग एकच गडगडाट हंशा सुरु झाला.

अशी मामा भाच्यांची जोडी. समर्थपणे आयुष्याचा आनंद लुटणारी. काळ पुढे सरकत होता. मामांच्या दंताजीनी फारकत घ्यायला सुरवात केली. आप्पाचे केस रंग बदलू लागले. मामांच्या हाती एक भक्कम दांडा आला. आप्पाच्या हाती कायम छत्री राहू लागली, ती दांड्याचेही काम करू लागली. हे शारीरीक बदल होत होते तरी दंगा तसाच होता. अजुनही कोर्टात केसीस तशाच चालत होत्या. जिंकतही तेच होते. उलट मामांच्या खोलीवर संध्याकाळी मामलतदार, तहसिलदार, बिडीओ, पोलीस इन्स्पेक्टर आणि प्रसंगी डेप्युटी कलेक्टर देखील आपले हुद्दे विसरून एकत्र कुरकुरीत कांदा भज्यांचा आस्वाद घेताना दिसत. सर्वांचा हसण्याचा आवाज चारी दिशांत पसरे. हुद्देदारांच्या हसण्याच्या आवाजापेक्षाही वर आप्पाचा आणि मामांचा आवाज असे. कारण, हे दोघेही कधीच कोणाचे गुलाम नव्हते.

डेप्युटी कलेक्टरलाही सांभाळून हंसायची संवय त्याच्या हुद्यामुळे पाळावी लागत होती. या स्वतंत्र आत्म्यांना ते बंधन कधीच पडले नाही.

.......

एके दिवशी मामांच्या गावावरून निरोप आला. रात्री झोपलेले मामा उठलेच नाहीत. आप्पा सैरभैर झाला. आईला घेवून मामाच्या गावी जायचे होते. मामांच्या मृत्युची बातमी वाऱ्यासारखी गावात

पसरली. आणि तालुक्याच्या गावातील लोक मामांच्या गावी धांवले. त्यांत सगळेच होते. सरकारी दफ्तरे रीकामी पडली. मामांची यात्रा पाहून लोक चकीत झाले. आप्पा म्लान चेहेऱ्यावर हसू आणीत सगळयांकडे जात होता. येईल ते बडबडत होता,

“मामा गेलो हो! माजा कसा होतला समजत नाय.”


“काय समजत नाय! काल होतो, आज गेलो. ”

महिना लोटला असेल नसेल. आप्पाही घरी चक्कर येवून पडला. डॉक्टरकडे नेण्या आधीच त्याने शेवटचा श्वास घेतला. त्याचीही अंत्ययात्रा मामासारखीच निघाली. दोघेही एकमेकांशिवाय रहाणे शक्य नव्हते हे खरे.

श्रद्धांजली देताना डॉक्टरांच्या हसऱ्या पण डोळे भरलेल्या मुखातून वाक्य निघाले.

“आता हे दोघयजण वर देवांका हसवत रवतले, गाळीय घालतीत बघा.”

*****


नर्मदा

रात्र वर वर सरकत होती. दशमीच्या चंद्रकोरीचा प्रकाश आसमंत उजळीत होता. झडेश्वरच्या देवळाच्या पायऱ्यांवर मी पहुडलो होतो. मनात कित्येक विचार चालू होते.

मधेच संतोषाने ढेकर येत होता. पुजाऱ्यांच्या घरचा प्रसाद स्वादिष्ट असल्याने दोन घास जास्तच झाले होते. नर्मदा मैयाच्या पात्रावरून येणाऱ्या झुळुका आईच्या मायेने गोंजारीत होत्या. सर्वत्र सामसूम होतं. मधेच कुठे तरी लांब एकादं कुत्रं भुंकण्याचा आवाज येत होता.

हळू हळू गुंगी येत मी झोपी गेलो. किती वेळ झाला होता समजलं नाही पण जाग आली ती कोणी तरी पाय चेपीत असल्यासारखं वाटलं म्हणून. आता चंद्र पश्चिमेकडे कलला होता. उजेड अंधुक झाला होता. आजूबाजूचं फारसं काही दिसत नव्हतं. मी हळूच कुशीवर वळण्याचा प्रयत्न केला. पण दचकलोच. माझ्या पायापाशी कोणीतरी बसलं होतं. खरोखरच माझे पाय दाबीत होतं. म्हणजे मला भास होत नव्हता. माझ्या पायाकडचा भाग एका

मोठ्या झाडाच्या सावलीत गेला होता. तिथेच सावलीत कोणी व्यक्ति बसून माझे पाय दाबीत होती. कोण होती ती व्यक्ति?

मधुन मधुन नर्मदा काठा बरोबर चालत रहायचं एक वेड लागलं होतं, मी काही परीक्रमा करत नव्हतो. पण चार दिवस सुट्टीचे मिळाले की नर्मदा काठ गाठायचा हे ठरलेलं. काय अनुभव येतात ते पहायचे व मन संतोष झाला की घरी परतायचं हा मानस ठेवला होता. कुणालाही सांगत नव्हतो की मी परिक्रमावाला नाही. मी भगवी वस्त्रे पण घातली नव्हती. दोन धोतरे व दोन सफेद कुडतेच बरोबर होते. एक अंगावर तर एक पिशवीत. एक छोटे पातेले व एक पेला एवढयाच सामानाचा मी धनी होतो. अगदी कफल्लकासारखा निघालो होतो.

कित्येक जण सांगत नर्मदेच्या किनाऱ्या वरून परिक्रमा करण्याऱ्याना खूप काही अनुभव येतात. कोणी मायेने पोटभर जेवू खाऊ घालतं तर कोणी हाडहूड करून अपमानीत करतं. काहीजण आदराने नमतात तर काही जवळचं सगळं लूटून नेतात या सगळ्याचा मनःस्ताप करून घ्यायचा नसतो की आनंद मानायचा नसतो. संन्यस्त रहायचं. मन निरपेक्ष ठेवायचे. ध्यान फक्त नर्मदेचं करायचं एकदा केव्हातरी नर्मदा प्रकट होते आणि दर्शन देतेच.

आज मी झडेश्वरला पोचलो होतो. दुपारी सुकी न्याहारीचे करू शकलो होतो. पण झडेश्वरला पोचलो आणि देवळात दर्शन केलं

त्यावेळी कसं कोण जाणे मुखावून एक हाळी निघाली. “हर नर्मदे” देवळाच्या गाभाऱ्यात घुमून ती चारी बाजूला पसरली. देवळात चिटपांखरु देखिल नव्हतं. माझी हांळी जशी आजूबाजूला दुमदुमली तसे एक गृहस्थ देवळा मागून लगबगीने देवळात प्रवेशले. मला म्हणाले.

“या! महाराज या! आता रात्रीचा प्रसाद आमच्या देवळातच असू दे आपल्या सारखे साधुजन या देवळात येतात म्हणून सामन्य जनही येतात.आज आपण आमचा पाहुणचार घ्यावा. “मी मान हलवली तसा तो लगबगीने निघून गेला. नकार देण्याचा सबंधच नव्हता. सकाळी केलेला कोरडा नास्ता केव्हाच गायब होऊन पोटात कावळयांनी फेर धरला होता. प्रसादाचं जेवण जेव्हा देवळात दिलं जातं ते सुग्रासच असतं हे माहीत झालं होतं.

देवळाच्या पुजाऱ्यानी रात्रीच्या आरती नंतर देवाला भोग चढवून माझं पानही देवळात आणून दिलं. एवढं होतं की मला दोन वेळा सहज पुरलं असतं. मी जेवण पूर्ण संपवलं. काही टाकायचं नाही, काही मागायचं नाही. समोर आलेला प्रसाद नर्मदा मैयाची भेट म्हणून स्वीकारायचा. जेवण संपत नाही म्हणून बांधून झोळीतही घालायचे नाही. मग जड झालेल्या पोटाने पुढचा प्रवास शक्य नव्हता. आता रात्र देवळातच काढावी म्हणून देवळा बाहेरच्या पायऱ्यांवर मी पहुडलो. खाली पायरीचा थंडगार दगड व

वर चांदणे असलेली आकाशाची वाकळ. नर्मदा मैया मधुनच आपला हात मायेने फिरवी. एकादी झुळूक येवून माया देऊन जाई. खरंच अतीव समाधानाने मी हळू हळू झोपाळलो आणि गाढ निद्रेच्या स्वाधीन झालो.

कोणी तरी पाय दाबतंय! कोण असेल? माझ्या तोंडातून एकदम उद्गार निघाले. "हर नर्मदे! आपण काय करताय हे? आपण आमच्या पेक्षा वडील आहात. पाप लागेल आम्हाला. आपण आमच्या व्रतात मोडता घालताय."

"बाबा कोण मोडता घालंल रे! अरे माझा दाल्ला असाच परीकम्मा करायला गेला. त्याला शोधतेय रे मी. तुला गवसला तर सांग त्याला मी हितं वाट बगतेय. आवाजावरून ती बाई होती व अतिशय वयस्क होती हे लगेच समजलं व मी म्हणालो.

"आई! आपण वयाने थोर. आमची सेवा केली हे पाप आम्हाला लागले. प्रायश्चित करावे लागेल आम्हाला. आणि तुमच्या नवऱ्यास आम्ही कसे ओळखणार? आणि समजा भेटलाच तर तुमची काय ओळख देणार?"

"अरे माझा दाल्ला कुणीबी ओळखल बगा! पैलवान हाय. दोन म्हशी बांदल्याल्या घरी. एकीचं चार शेर दूद एका कासवीनं तोंडाला लावी नी पुरं झाल्यावरच कासवी खाली ठेवी. दुसरी म्हस

आमच्या साठी, म्हंजे मी आन् पोरांसाठी बांधली बग त्यानं. लई जीव माझ्यार, नी पोरांवर. पण खात्री हाय तुला तो भेटेलच. मन सांगतं माजं. नर्मदामाय बोलतीय बग कानांत. हा पोर शोधंल तुझ्या दाल्याला. शोध ना बाबा जरा. लई वर्स झाली, जीव थकला सर्वानला सांगुन. तू कर माझं एवढं काय.''

''पण आई! त्याचं नाव गाव चेहरा मोहरा काही माहीत नसताना कसा शोधणार हो मी? त्याचा फोटो आहे का? दाखवलात तर मनात साठवतो. आणि बघतो प्रयत्न करून. त्याची आणखी माहिती सांगा म्हणजे मदत होईल शोधायला. तुमचं नाव गाव,मुलांची नावं देखिल सांगा म्हणजे भेटलाच तर ओळख पटविता येईल.''

आसं बग. माझं नाव नर्मदा. लय हौशेन ठेवलं होतं रे त्याने. नर्मदामैय्यावर लई जीव बग म्हणून मला बी नर्मदाच. पोरांची नाव काय तर शंकर मोठा, ईस्वर दुसरा नी दत्ताराम तिसरा. झाले बग सगळे. गाव तिकडे अक्कल कुव्या फुडं खानदेशात. सातार कडनं आलो ऱ्हायला, नर्मदा जवळ म्हणून.

माझा दाल्ला पैलवान. दूद पी, जोंधळ्याच्या, दादरीच्या सा सात भाकऱ्या एका येळेला खायचा. लई वांड हुता बग. गाव उंडरायचा. शिकारीला जायचा. पण खरा मर्द हुता बघ. चार पांच जणाना एका फिरकीत लोळवायचा. मी बी हैराण व्हायची बग

रातीला. सांड हुता तो. माज्या बरोबरच संग नी भायेर बी संग. मला राग नाय यायचा. मनात म्हणायची.देवान् सोनं घातलया पदरात. एकटीच्या नाय मावत तर घेऊ देकी दुसऱ्याना. आपल काय जातं. तो आनंदात ऱ्हातोय न्हवं? मला नी पोराना बगतोय न्हवं मंग कश्याची राग धरू? काळाभिन्न हाय पण कसा नजर लागण्यावाणी हाय रे. गावचे त्याला कन्या म्हणत्यात बग. काळा सांवळा म्हणून. त्याचं मैतर पण खूप. गावचे सगळे पोर टोर याच्याच मागं मागं, पोरी देखिल. गोपिका रे! दुसरं काय. म्हणूनच मला राग न्हाय.

पण एक पाळायचा. दर वर्साला चैतपुनवेला नर्मदा काठी यायचा. शुल्पाणेस्वरला येवून बसायचा. गावावरून धा दिवस आगुदर निघायचा आन् पुनवेच्या सकाळी पोचायचा. नर्मदामैयावर फार जीव.

घरी आला की माझ्यासाठी कायतरी आणीच आणी. जीव होता रे माझ्यावर. माजी आठाव काळजांत ठेवूनच जायचा रे भायेर.

दूद प्यायचा ती म्हस मेली एका पावसांत. धाय धाय रडला. म्हणाला पाप वाढलंय बग. जातो नर्मदेला परदक्षिणा घालतो आन् माफी मांगतो बग तिची. माझ्या पोटात गोळा आला. नर्मदेची परदक्षिणा? तीन चार म्हयने जातात एक परदक्षिणा करायला. पाऊस तोंडावर आलाय. आजार, जनावर सगळयाचंच भ्या. कसा निभाव लागेल पण आडवेल कोन? मनात आलं की निगालाच.

गेला बग, तो आजपतूर न्हाई आला. धा पावसाळे झाले शोधतेय त्याला. जो भेटंल त्याला सांगते बग माझी काहानी. इनती करते शोधा म्हणून. नारळ घूप करते नर्मदा मैय्याला.

मन सांगतं जीता हाय त्यो. न्हाई जाणार तो लवकर. पैलवान हुताच पन लढणारा बी हुताच. आजार म्हाईतच न्हाई बग त्याला. तो काय आजारी पडंल? अरे जनावरांच पण भ्या न्हाई त्याला. वाघ अंगावर आला तर बी फाडून ठेवणारा गडी हुता त्यो.

एक जोरदार वाऱ्याची झुळुक आली. झुळुक कसली! गोल गोल फिरणारी वावटळ होती. बरोबर धूळ, कचरा, पाने घेऊन आम्हाला घुसमटवून टाकणारी वावटळ होती. मला तर श्वास घ्यायला देखिल कठीण पडत होते. पण मनात एक विचारांचा उगम सुरू झाला होता. तो या आपली गोष्ट सांगणाऱ्या नर्मदेने चालू केला होता. मी उच्चभ्रू लोकांत शिकलेला,काम केलेला,वावरलेला परीटघडीचा माणूस. एका अज्ञात जिज्ञासेने नर्मदेच्या काठावरून अभ्यास करायसाठी फिरणारा. त्याला ही नर्मदा का भेटली? ती आपली गोष्ट कां सांगते आहे? ती गोष्टही अशी की सुशिक्षित, सुसंस्कृत समाजाला दिवसाच्या उजेडात तरी न पटणारी, तरी देखिल तशीच काहीशी, आयुष्याशी तडजोड करणारी. पण एक विसंगती होती दोन्ही संस्कृतीत. तिने तडजोड केली तरी प्रेम उत्कटच ठेवलं. त्याने जे काही केलं ते उघड उघड केलं. दडवा

दडवी जराही नाही. तिनेही प्रेम केलं ते तो जसा होता त्याच्या सकट केलं. त्याला कुठेही अव्हेरला नाही. सुशिक्षितात याला क्षमा नव्हती. भांडण तंटे विकोपाला गेले असते. अगतिकतेने काहीजणानी ते सहन करीत आयुष्य कंठलं असतं. पण त्यांत प्रेम, विश्वास उरलाच नसता. एक शुष्क नाते ते जगले असते. मग या अशिक्षित मागासलेल्या बाईत एवढं धैर्य, एवढा समजूतदार पणा, एवढे अपरंपार प्रेम कसे? हा विचारांचा ओघ आता जोरात वाहू लागला होता.

मी सहजपणे माझ्या गत आयुष्यात गेलो. कित्येक लोक नजरेसमोर येवू लागले. छोट्या छोट्या गोष्टींवरून भांडणारी जोडपी. काही प्रतारणा करणारे पुरुष म्हणून भांडण, काही संशयाची भुते घेऊन भांडणाऱ्या बायका, काही ठिकाणी बाहेरून आगी लावणाऱ्या नातेवाईकांमुळे उफाळलेला असंतोष. तर कधी अगदीच क्षुल्लक बेबनावा वरून ढळलेली शांती. काय होतं हे? कोती मनं? संशयी मनं? स्वार्थी मनं? नात्यातली अशांती कशामुळे? मन कलुषीत व्हायची कारणं काय? दिवसा उजेडी संभावीतपणे प्रतिष्ठेचा आव आणणाऱ्यांची रात्री फिटणारी लक्तरं? ढोंग पांघरुन वागणारी ही माणसं सहजगत्या डोळ्या समोरुन झरझर निघून जात होती.

मी देखिल त्यातलाच एक. इंजिनियर म्हणून धरणावर काम करणारा, गलेलठ्ठ पगाराच्या हव्यासाने बायका, मुलांपासून महिनेन् महिने दूर रहाणारा. त्यांची चिंता बाळगाणारा, बायको एकटी कशी सांभाळीत असेल याची चिंता करणारा,क्वचित प्रसंगी मनात संशयही बाळगणारा, पण तिला भेटल्यावर आत्यंतिक प्रेमाचा लोट दाखवणारा असेच सगळे ढोंगी असतात का? आजही काय करतोय? मी काही परिक्रमा करत नाही. फक्त नर्मदेच्या काठावर काय घडतं, जीवनमान कसं आहे, नर्मदेवर एवढं प्रेम लोक का करतात? परिक्रमा म्हणजे काय? नक्की कशासाठी करतात? हे समजून घ्यायची एक ओढ लागली म्हणून निघालो. पण आता जे काही धडते आहे. जे लोक समोर येतायत ते मन ढवळून काढत आहेत. नर्मदा मात्र शांतपणे आपल्या मार्गाने वहात आहे. मधेच एकादी झुळुक तिचा मायेचा थंडावा दाखवून जात आहे. तिच्यातलं स्नान आल्हाददायक वाटत आहे. पण काठावर घडणाऱ्या गोष्टीतून एक प्रवाह माझ्या मनात सुरू होतोय. सभ्रमांचा, कोड्यांचा तो पुढे जाता नर्मदेसारखाच संथ धीरगंभीर होऊन या सगळ्यांची उत्तरं देईल का? आत्ता तरी डोंगरकड्या वरून उड्या घेणाऱ्या प्रवाहासारखा खळखळता आहे. त्याला आवर कसा बसणार?

“मी काय विचारतेय बाबा? ऐकतोस का रे?” त्या बाईच्या वाक्याने माझी विचारांची समाधी तोडली. मी एकदम म्हणालो. “हां! काय म्हणालात?”

“अरे! करशील न्हवं माजं काम? माजा जगायचा आधार रे त्यो. तो गवसला तरच पुढं जगायचं नायतर काय करणार रे जगून?”

“अहो पण मी त्याला आता कसा ओळखीन? तो ही वयस्क झाला असेल. पैलवान थोडाच राहिला असणार? परीक्रमा करताना खाण्यापिण्याची आबाळ झाली असेल तर रोडावला असेल. आणि दहा वर्षात तो आला नाही, साधु वगैरे बनला असेल तर? कसा ओळखता येईल?” मी.

“आस्सं म्हनंतोस? आसंल बाबा आसंच. साधुपण होईल त्यो. सगळी मनमानी करून सुकं भोगली की विरक्ति येते म्हणतात. म्हणूनच आला नसेल त्यो. काहीजण म्हणत्यात मेला असेल, काही म्हणत्यात नर्मदेन् गिळला असेल. खोटे मेले! नर्मदामैया हाय ती. प्रेम करणाऱ्याला गिळायला काय माणूस हाय थोडीच? तू सांगतोस तेच खरं बग. साधू झाला आसंल. आता परतेक दाढीवाल्याला, भगवं त्यालेल्याला पकडते बघ. शोधलाच पायजे त्याला. नातवंडं हायत की तीन. त्यास्नी चेरा दाखवाया हवा आजोबाचा. त्या शीवा त्याला मुक्ति मिळंल का. संसारी माणसानं साधु होताना इचार नको कराया? बघ! बघ! तू पण बघ साधूत

मिळतोय काय त्यो? तू चतुर हायस, बरोबर इचार करतोस. तुला गावेल बग त्यो."

केवढा विश्वास? केवढी जबाबदारी टाकत होती ही माझ्यावर पेलणार काय ही मला? विचारात असतानाच मी तिला प्रश्न केला "त्याचं नाव काय? गावातले लोक कोणत्या नावाने हाक मारायचे त्याला? ते समजलं तर ओळख पटवायला बरंच सोपं होईल काय नाव म्हणालीस?"

"कन्या म्हणायचं समदं गाव. पोरं टोरं बाया बाप्पे सगळ्यांचा कन्या. कन्या म्हंजे किरीष्णच ना रे? हुताच तसा तो." असे बडबडत म्हातारी नर्मदा तिच्या भूतकाळांत शिरली असे वाटू लागले. कारण एक बारीकशी स्मित हास्यात मिसळलेली समाधानाची लकीर तिच्या चेहेऱ्यावर उमटली होती. चंद्र केव्हाच मावळला होता. एकाद्या घटकेनंतर झुंजुमुंजू होईल एवढा प्रहर झाला होता. काकड आरती साठी देवळाचा दरवाजा उघडून पुजारी तयारी करू लागले होते. देवळाबाहेरचे दिवे त्यांनी लावले आणि म्हाताऱ्या नर्मदेचे पूर्ण दर्शन मला झाले.

पांढरे झालेले केस. त्याचा मागे बांधलेला आंबाडा. खणाच्या कपडयाची चोळी. नऊवारी साडी पण ओचे खेचून गुडघ्यापर्यंत होईल अशी नेसलेली. सावळा वर्ण. सुरकुतलेला चेहेरा व हात पाय. वार्धक्याची सगळी लक्षणे तिने केव्हाच चढवली होती.

सौभाग्याचं प्रदर्शन म्हणून आंबाडयावर मोगऱ्याची वेणी व कपाळावर रुपाया एवढे गोल कुंकू तिने अट्टाहासाने लावले होते.

"येऊ रे बाळा? काकड आरतीची येळ झालीबग." तिच्या या वाक्याने मी भानावर आलो. ती उठून उभी झाली. बाजूला ठेवलेला दांडा उचलून ती चालू लागली. दांडा घेऊनच चालावे लागेल एवढी ती पुढे वाकली होती. काय वय असेल हिचे? दहा पावसाळे ही आपल्या नवऱ्याला शोधतेय? या वयात मुला नातवंडांच्या सहवासा पेक्षा नवऱ्याला शोधण्याचा वसा घेतला हिने? कोणती शक्ति असेल? मी विचारात असतानाच दांडयाचा टक् टक् आवाज क्षीण होत गेला. नर्मदा आजुबाजूच्या अंधारात गुप्त झाली.

*****


माणूस

"कुठे चाललास रे" मागून विचारणाऱ्याचा आवाज मी तात्काळ ओळखला. सुऱ्या होता तो. ताबडतोप पाय थांबले. सुऱ्या भेटला की आनंदाची बरसात. तो मोह सोडण्या एवढे साधुत्व अजून यायचे होते. सगळे मित्र नुकतेच गद्धे पंचविशीतून बाहेर पडत होतो. नुकतेच नोकऱ्या लागलेले आणि सेटल व्हायसाठी हातपाय मारणारे. एक दोन नाही पण एक मोठी गॅंगच होती आमची. संध्याकाळी एकत्र जमून गप्पाटप्पा चालत.

सुऱ्या इंडियन एअरलाईन्स मधे कार्गो डिपार्टमेंटला होता. त्यामुळे सगळयाना कोणती वस्तु कुठून विकत घ्यायची याचे ज्ञान तो फुकट वाटी. वर सांगे, "सांग त्या हरामी केसवानीला मी पाठवलय म्हणून." सुऱ्याला कुणाची ओळख अशी फारशी लागली नाही. तोंड ओळखीतच तो सलगी करून टाकायचा. आणि लोक त्याची मैत्री पहिल्याच भेटीत मान्य करायचे. एकदम मैग्नेटिक पर्सनॅलिटी.

असा हा सुऱ्या उर्फ सुरेंद्र आमचा म्होरक्या होणारच.

सगळ्याना पुढे पडून उपयोगी होण्याचं व्यसन असलेला हा. कुणाच्याही घरात घुसून आरोळी ठोकत असे. "आई मी आलोय चहा नाष्ता आज तुमच्याकडे करावासा वाटला. कांदेपोहे की बटाटे पोहे?" हे रसायन सर्वानाच माहीत असल्याने त्याची अडचण, आत्ताच कुठे तडफडला हा, वगैरे विचार कुणाला येत नसे. उलट वातावरण एकदम बदलून जाई. "आई गुडघा काय म्हणतोय तुमचा? अरे हो! तुमच्या गुडघ्या साठी ही बाटली आणलीय मी. एक लिनीमेंट आहे. पहा लावून." हा जिव्हाळा पाहून त्या घरात त्याची नाष्त्याची बशी जरा जास्तच भरली जाई. जाता जाता म्हणे, "आई एवढे पाय गुडघे दुखतात तर शिऱ्याचे लगीन करून टाका" या वेळी तो शिऱ्या म्हणजे श्रीनाथ लटका खवळे." तू माझ्यापेक्षा मोठा आहेस तू कर आधी." पायात चप्पल घालता घालता म्हणे, "आई पहा हो माझ्या साठीही कोणीतरी."

इथे वातावरण जरा टेन्स होई. सुऱ्या एकटाच होता. आई वडिल चार पाच वर्षापुर्वी एका मागोमाग गेले होते. आणि सुऱ्या त्या भल्या मोठ्या फ्लॅट मधे एकटाच रहात होता. स्वतःच सर्व काही करत होता. घर एकदम टापटीपीत ठेवत होता. कधीतरी नाश्ता, जेवण करायचा कंटाळा आला की कुणा मित्राच्या घरी हजर व्हायचा. हक्काने जेवणार म्हणून सांगायचा आणि ते घर आनंदी व्हायचे. कारण त्याच्या गप्पा ऐकण्याचे वेड सर्व घरात पसरले होते.

Positivity चा कहर म्हणजे आमचा सुऱ्या. Helping hand म्हणजे सुऱ्या. रात्री बेरात्री कुणाच्याही मदतीला धावे. सरकारी कामकाज अडले की कुणालाही सुऱ्याचीच आठवण होई. कार्पोरेशन, सचिवालय कुठलेही काम असो, सुऱ्याची तिथे ओळख असो वा नसो सुऱ्या ते काम नक्कीच करवून घेई. त्याच्या बोलण्यात लोक गुंडाळले जात. यात मोठमोठे सरकारी अधिकारीही असत.

या कामांसाठी जाताना तो आपला युनिफॉर्म घालून येई. पांढरी पॅंट, पांढरा शर्ट, दोन्ही खांद्यावर चमकणारे इंडीयन एअरलाईन्सचे एम्ब्लेम व डोक्यावर हॅट. रुबाबदार दिसायचा एकदम. "आपण देखिल सरकारी नोकरीत आहोत हे समजले की सरकारी अधिकारी अर्धे पटतात. भाईकी रे"

अजूनही आठवते लग्न ठरले आणि हा माझ्याकडे आला. "अरे साखरपुडा केव्हा करतोयस? सायलीच्या फुलांचे हार देतो तुला. साखरपुड्यात बायांना वाटा. याद करतील आयुष्यभर." आणि खरंच साखरपुड्याला खास बंगलोर वरून आलेले सायलीचे हार घेऊन महाशय दुपारी तीन वाजता घरी हजर झाले. मुंबईच्या उडप्याना हे हार पुरवणारा व्यापारी सुऱ्याच्या दररोजच्या भेटीतला.

लग्नानंतर पहिल्यांदा आमच्या घरी आला आणि आरोळी ठोकली, "वैनी! मी आलोय सुऱ्या. सायलीच्या हार वाला. वसुलीला आलोय झकास नाश्तापाणी करा." त्या दिवसापासून सुऱ्या आमच्या घरचाच झाला. अगदी मरे पर्यंत.

अरे काय लिहून गेलो मी! हो सुऱ्या आता नाही. हाता तोंडाशी आलेल्या मुलाच ओझे त्याला खांद्यावर वाहायला लागले त्यानेच तो खचला, मोडला, विरघळला.

सगळ्या मित्राना अनाथ करून गेला.

देवाने त्याच्यातला सुंदर माणूस का काढून घेतला हा प्रश्न काही सुटत नाही.

*****


पोर्ट्रेट

दहा वाजले असतील समर्थच्या पार्टीवरून यायला खूप उशीर झाला नव्हता. त्याने पार्टी आटोपशीरच ठेवली होती. त्यामुळे मलाही बरे वाटले होते. घरी लवकर पोहचल्यामुळे माझे लिखाण करायला मला चांगलाच वेळ मिळणार होता.

झटपट वॉश घेऊन मी नाईटड्रेस चढवला. लिहिण्यासाठी मी बेडवरच बसत असे. आरामात टेकून बसून मांडीवरच्या पॅडमधे लिहीण्याची संवय पडली होती.

बेडच्या समोरच्या भिंतीवर आमचे दोघांचे एक सुंदर पोर्ट्रेट लावले होते. माझी सौ. सुचित्रा आणि मी. पोर्ट्रेट अतिशय सुंदर झाले होते. खुर्चीत बसलेली सुचित्रा आणि बाजूला मी उभा. माझा हात तिच्या हातावर टेकला न टेकलेला असा दिसत होता. जणू कांही तिला मी पूर्ण आश्वासीत करतोय असेच त्यांतून प्रतित होत होतं. सुचित्राच्या डोळ्यात पूर्ण समाधान ओसंडून वहात होतं. माझे लक्ष सहज तिच्या डोळ्यांकडे गेले. एवढयात स्वयंपाक घरातील आवरा आवरीचा आवाज ऐकू आला.

सुचित्रा आता सर्व आवरून झोपायला येणार. दमलेली, थकलेली असणार तरीही बेडच्या बाजूला ठेवलेल्या पुस्तकातून एकादे पुस्तक वाचायला सुरुवात करणार.

मी माझ्या कथा लिहीण्यात गढून जाणार पण मधुनच सुचित्राने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणार. हा दररोजचाच किस्सा. आजच्या पार्टीमुळे वेळ थोडी बदलली होती एवढेच.

मी लिहायला घेतले आणि थोड्याच वेळात सुचित्रा सर्व आवरून आली. बहुधा तिने चांगलाच वॉश घेतला असावा. साबण किंवा शांपूचा सुंदर वास दरवळला. सहज लक्ष सुचित्राकडे गेले ती थोडीशी लंगडतच येत होती. तरीही तिची लगबग चालूच होती. पहिली फेरी तिने रात्रीसाठी पाणी आणायसाठी मारली. दुसऱ्या फेरीत दोन नॅपकीन आणून ठेवले. तिची ही लगबग मी निरखत होतो. एकाच फेरीत हे सर्व करता येत असूनही दोन चार फेऱ्या मारल्या शिवाय या बायकाना चैन पडत नाही का? असा विचार आला.

“वय झालं ग बाईऽऽ! आता जास्त उभं नाही रहावत” एवढे बोलून ती बेडवर बसली.

“फार दमलीस?” मी

“दमणार कशाला? आयतं पार्टीचं जेवण करून आलोय. मला संध्याकाळी कांहीच करावं लागलं नाही. पण पार्टीत फार वेळ उभं राहून पायात वळ येतात आता.”

बरोबर होतं तिचं, चाळीशी केंव्हाच पार केली होती तिने. आमची मुलंही शिक्षणासाठी बाहेर पडली ती चुटपुटतीच केंव्हातरी येत. आता तर परदेशीच गेली. यायचा विचार दिसत नाही. नको तो विचार.....

“गोळया घेतल्यात तुमच्या?” सुचित्राचा नेहमीचा प्रश्न आलाच

“हो, केव्हाच. तू हा प्रश्न विचारणार माहित होते मला. म्हणून दररोज आठवण येते. कधी विसरलो तर सोडणार का तू?”

सुचित्रा बेडवर आडवी होत रजई नीट करू लागली होती. आडवी होत तिने टाकलेला उसासा ऐकून माझी नजर तिच्याकडे गेली. “केवढी दमते ही?” मनातच म्हटले.

“पार्टी आटोपशीर झाली. हो ना?”

“अहो फारच आटोपशीर झाली.”

“पण तुम्ही आज दोन बिअर जास्तच प्यालात. लक्ष होतं माझं”

“अगदी साधी बिअर होती तीन ग्लास म्हणजे फार झाली? अगदीच साधी होती”

“का! हो! समर्थचं बरं चाललंय ना? आर्थीक परिस्थिती चांगली आहे ना?”

“असेलच ग! त्या शिवाय पार्टी देईल का! हो थोडी काटकसर दिसली. असू दे! पण सर्वजण भेटले त्यांतच मजा आली.” मी

आता पर्यंत सुचित्राने बाजूचे पुस्तक उचलून वाचायला सुरवात केली होती. मी देखिल लिहणे सुरु केले. माझ्या कथेतला नायक एक लँडस्केपींग करणारा होता. त्याच्यावर लिहीत होतो. ही एक प्रेमकथा होती. बरं झालं सुचित्राला फक्त रहस्यकथाच वाचायला आवडायच्या. माझ्या गोष्टी तिने कधीच वाचल्या नव्हत्या.

“काय वाचते आहेस? दमलीस? झोप नाही आली?” खरेतर तिने लवकर झोपावे असे वाटत नव्हते.

“काहीतरी वाचल्यावरच झोप येते मला. माहीत आहे ना? आणि तुम्ही झोपल्या शिवाय झोपते का मी कधी?”

खरेच होते. माझी काळजी घेण्याचे व्रत लग्न झाल्यापासून जपत होती.

“चार पाने झालीत अजून कांही रहस्यमय घडत नाही, पहाते एक दोन पाने वाचल्या नंतरही काही मजा नाही आली तर ठेवून देईन.”

“वाच तू. तू जवळ असलीस की मला लिहायला सुचते.”

सहज माझे लक्ष पोर्ट्रेटकडे गेले. तिच्या चेहेऱ्यावर पसरलेला तो शांत समाधानी भाव, मंद स्मित, डोळ्यामधून पाझरणारी तृप्तता आमच्या सहचर्याबद्दल सर्व कांही सांगून गेले. नजर सुचित्राकडे वळली. तोच भाव, तेच स्मित आणि तीच तृप्तता तिच्या चेहेऱ्यावर आताही दिसत होती.

माझी लेखणी एकीकडे चालत होती.

“काय हो तुमचे काम कसे चालले आहे. कोण आहे हा बंगलेवाला?” सुचित्रा

“हा नाही, ही आहे ती. एक भरपूर श्रीमंत पण एकटीच आहे.”

“हो? काय करताय तिथे?”

“लँडस्केपींग. पण कांही अर्थ नाही. तिने स्वीमींगपूल मोठा करुन बंगल्याची ग्रीनरी घालवायचीच ठरवलीय तर मी तरी काय करणार. तिला सहन करावं लागतय पटत नसलं तरी.”

मी कागदावर लिहीत असलेली कथा तिला खरा प्रसंग म्हणून सांगत होतो.

“काय वयाची आहे हो?”

“असेल पंचेचाळीशीची एक दोन वर्षे कमी जास्त.”

“अस्सं? म्हणजे माझ्याच वयाची?” मग पुस्तक बाजूला ठेवून सुचित्राने रजई ओढून घेतली एकटक माझ्याकडे पहात म्हणाली, “सुंदर असेलच!”

“हो! घारे डोळे, उंचीपुरी, दुसरी ऐश्र्वर्या राय समज ना.”

“अस्सं?”

या दुसऱ्या “अस्स” मधे बरेच कांही होते. स्त्रीसुलभ असूया. मी दचकलो सुचित्रा चिडली कां असं वाटून गेलं. मी तिच्याकडे सरकलो रजईवर हात थोपटत म्हणालो. “अग असते एकादी बाई सुंदर पण मी माझे प्रोफेशनल एथिक्स पाळतो.”

“हो पण तिचं काय? ती ही एकटीच असते ना? आणि तुम्हीही....एकटे.” सुचित्राने आता रजई पूर्ण डोक्यावर ओढली.

......

.......

ऐश्वर्या फार चिडली होती. तिच्या मनासारखे काम होत नव्हते. पण त्याला मी जबाबदार नव्हतो. तीच मधे मधे सर्व बदलायला लावत होती. पण अट्टाहास केवढा. केलं तरी रागावते नाही केलं तरी तेच. काम बिघडणार नाहीतर काय.

......

.......

माझी कथा पुढे चालली होती.

"काय हो! ऐकलं नाहीत काय? ती एकटीच असते ना? आणि तुम्हीही एकटेच."

"मी कशाला एकटा असणार? तू आहेस ना. मी तुझ्या पेक्षा सुंदर म्हटलं नाही तिला. माझं तुझ्यावर जेवढं प्रेम आहे तेवढं कुणावरच नाही. आणि नुसतं सौंदर्य काय करायचं आहे? स्वभावही नको का? समाधानी? प्रेमळ, मनमिळाऊ काळजी करणारा, ...तुझ्यासारखा?"

मी अजूनही रजई थोपटत होतो. हळूहळू रजई आणि गादी एक होऊ लागली. सुचित्रा केंव्हाच पोर्ट्रेटमधे परतली होती. माझी कथाही लिहून संपली होती. डोळे पेंगुळले होते. पार्टीतला समर्थचा तो प्रश्न आठवला "तू कशाला घाई करतोस निघायची? नाहीतरी दोन वर्ष झाली, एकटाच आहेस घरी."

मुले आली की म्हणायची, "आई पोर्ट्रेट मधे किती जिवंत वाटते नाही?"

पण त्यांना कुठे माहीत. दररोज ती त्या पोर्ट्रेट मधून बाहेर येवून माझ्याशी बोलते, गोळ्यांची आठवण देते, माझ्या पिण्यावर बारीक

लक्ष ठेवून मला दटावते, लिहीत असलेली माझी गोष्ट मी तिला माझी दिनचर्या म्हणून सांगेतो. अगदी लग्न झाले तेव्हापासून करायची तसेच रुसवे फुगवे, तशीच काळजी, तसेच दटावणे, तसेच प्रेम कांहीही बदलले नव्हते. मी एकटा कधी नव्हतोच. ऱात्री न चुकता नऊ साडेनऊला मी लिहायला बसत असे. कारण सुचित्राची पोर्ट्रेट मधून यायची वेळ मला चुकवायची नसायची.

दोन वर्षापूर्वी सुचित्रा गेली असं सर्वच म्हणतात. त्या आधी सहा महिने काढलेल्या पोर्ट्रेट मधे असलेली समाधानी जिवंत प्रतिमा रोजच पोर्ट्रेटमधून बाहेर येऊन मला सोबत करते हे माझे सिक्रेट मी कुणालाही सांगणार नव्हतो.

*****


मैत्रीण, बायको,
मी व मित्रमंडळ

"शामराव आलेत!" सौची आरोळी ऐकली आणि मी एकदम सावरून बसलो. ही दरवाजा उघडून जाता जाता पुटपुटलीच "वात आहे. एक तास कसलीतरी वटवट ऐकावी लागणार." हे पुटपुटणे मात्र अशा आवाजात होते की ते मला स्पष्ट ऐकू यावे, पण पुढच्या दाराकडे बसून शूज काढणाऱ्या शाम्याला ऐकू जाऊ नयेत.

मला बायकांची ही हुशारी पाहून नेहमीच आश्चर्य वाटे. आम्ही असे कांही करू गेलो तर आमचे हळू आवाजातील बोलणे नक्की तो माणूस ऐकू शकत असे. पण ज्याच्यासाठी बोलले असू तो मात्र "काय म्हणालास?" असे परत विचारीत असे. एकदोनदा अशी फजीती होऊन ओशाळवाणे वाटल्यावर हा मार्गच मी वर्ज्य केला होता. पण अमची सौ मात्र यात फार तरबेज झाली होती. माझ्या मित्र मंडळातील कोणीही आले की हिचे शेरे ( की ताशेरे ) मला असेच ऐकवले जात.

शाम्या आला की हिला "वात" येई.

सुऱ्या आला की हिला "जोकर" आठवे

अव्या आला की हिला "जीराफ" आठवे

पक्या आला की हिला “बकासूर” आठवे

नंदू आला की हिचा “गांवठी” हिरोचा कॉमेंट जाई.

आणि माझी एकुलती एक बालमैत्रीण शरू आली की..... अहो जे कांही होई तो एक रंग बदलणाऱ्या सरड्याचा अवतार वाटे. दोन्ही बाया अगदी प्रेमाने वार्तालाप करताना दिसत, पण मला त्या आतून धुमसताना दिसल्या सारखे का वाटे हे समजत नसे.

“शामराव? म्हणजे शाम्या एक अत्यंत प्रगल्भ विचारांचे चालते बोलते ज्ञानभंडार होते, असा माझा ठाम समज होता. पण ही मात्र तो गेला की बडबडे” मारे आव आणतात, तत्वज्ञान, राजकारण समाजकारण सगळयामधे यांची जाणकारी, एक तास थापा खपवायला तुमच्या सारखं गिऱ्हाईक मिळालंय त्यांना. एवढे जाणकार आहेत तर केवढे मोठे व्हायला पाहिजे होते यांनी. तत्वज्ञानी, समाजकारणी, कांहीच नाहीतर राजकारणी तरी. अहो थापा फार छान मारतात. आव तर एकाद्या तज्ञासारखा आणतात. तोही कोणत्याही विषयावर. राजकारणीच व्हायला हवं होत यांनी.” शामरावच्या प्रत्येक आगमन- गमना नंतर हीच आरती ओवाळली जायची. मी मात्र शामराव साठी श्रोता व सौ साठीही श्रोताच असायचो. त्यामुळे माझ्या कौटुंबीक जीवनात या शिवाय कोणतीच वादळं आली नाहीत.

हे मित्र रविवारी किंवा रजेच्या दिवशी येत. त्यावेळी साधेच वादळ येई. पण शरु येऊन गेली की चक्रीवादळ येई व चार दिवस तरी त्याचे परीणाम सोसावे लागत.

आज आता शाम्या आलाय पाहू काय होते ते.

“शाम्या! ये! बरेच दिवसानी आलास?” मी

“हो? अरे मला वाटते मी दहा दिवसापूर्वी नानकजयंतीची रजा होती त्या दिवशी येऊन गेलो की. विसरलास?” शाम्या

“हो का? अरे विसरलोच. बरोबर! बरोबर! बरं मग आज काय?” मी स्वतःलाच सांभाळायचा प्रयत्न करीत होतो.

“आज काय असणार? महागाई रे! महागाई! माणसाला मारून टाकणारी महागाई झालीय, अरे बारा बाय चौदाची पिशवी देखिल १०० रुपयात भरत नाही हल्ली. कशायमुळेच नाही. भाजी बाजारात गेल तरी नाही. किरयाणा आणला तरीही नाही. नोटा किती पटापट संपतात.

अरे पावलीत हे एवढे शेंगदाणे मिळायचे. आता पाच रुपायाचे घेतले तरी त्याच्या पेक्षा कमीच येतात. धडकी भरते रे काही घ्यायचे म्हटले तर. केव्हा तरी चहा प्यावा वाटला तर हॉटेलच्या बोर्डवर चहा -७ रु. वाचून परत फिरतो रे. हॉटेलात बसत देखिल नाही.”

एवढयात सौ. आमच्या दोघांसाठी चहा घेऊन आली. चहा शाम्याच्या हातात देता देता म्हणाली “अहो शामराव तुम्ही कशाला उगीच हॉटेलात जाऊन चहा पिता. आमच्या यांच्या सारखे कित्येक दोस्त आहेतच तुमचे. ज्ञानामृत त्यांनाही पाहिजे असते. जायचे त्यांच्याकडे चहाची लहर आली की. ते ज्ञानामृत पितील व तुम्हाला चहा. शेवटी आयुष्य म्हणजे काय? गीव्ह अँड टेकच ना?”

मला तिचा हंसरा चेहरा पहाता पहाता शंका आली यात खरोखर प्रामाणिक हेतू आहे की ही शाम्याची उडवते आहे.

“वैनी, तुमचं ठीक आहे हो. पम्या खूप कमावतो साहेब आहे तो तालुक्याचा. त्याला कसली महागाई हो. वैनी! तुमच्या घरी भाज्या बिज्या शेतकऱ्यांकडून येत असतील ना? पम्यावरच्या प्रेमाखातर? तुम्हाला काय झळ लागणार महागाईची.” शाम्या चहाचा भुरका मारायला थांबला आणि सौ ने सुरू केले “अहो कसले साहेब तालुक्याचे? साधे मामलेदार आहेत ते. कलेक्टर नाहीत सगळेच फुकट घरात यायला. आम्ही भाज्या वगैरे विकतच आणतो. केव्हातरी एकादा कोणीतरी आणून देतो वांगी, शेवग्याच्या शेंगा. म्हणून दररोज भाजी फुकट येते समजू नका. आम्हालाही महागाईची झळ लागतेच. आणि हो! तुम्ही याना अशी शाळेतल्या नांवाने हांक मारू नका. मुले ऐकतील. बरे नाही हो ते!”

मला “पम्या” म्हटलेले हिला का रुचले नाही? आम्ही शाळेतले, खेळातले, दंगामस्तीतले लहानपणापासुनचे मित्र. एकमेकाला अशाच नांवाने हाक मारणार.

“पद्माकर म्हणत जा ना!” सौ ने संवादाची समाप्ति केली. “वैनी चिडल्या का रे? तुला पद्माकर म्हणायची सवय करायला लागेल रे. बोलताना जुनेच सवयीचेच नाव येणार ना तोंडातून?” शाम्या कळवळून बोलत होता.

“तू म्हण रे पम्या मला. काही होत नाही मुलांवर परीणाम. ती समजतात सगळे काही. हुषार असतात रे आजकालची पोरं.” मी त्याला सावरायसाठी बोलत होतो. “तर काय सांगत होतास तू महागाईबद्दल काहीतरी बोलत होतास तू”

“अरे हो रे! फारच महागाई झालीय. काही समजत नाही कसे होणार ते. काही लोक म्हणतात लोकसंख्या वाढली म्हणून महागाई झालीय, काही म्हणतात पाऊसपाणी बरोबर नाही म्हणून झाली. मग मी अभ्यास सुरू केला महागाई वाढतेच का? कालच्या पेक्षा आज भाव वाढायचे कारणच काय? दरवाढ तेव्हाच होते जेव्हा मागणी पेक्षा पुरवठा कमी होतो. मग काय? एका दिवसात मागणी एवढी वाढते?” शाम्याची ज्ञानगंगा वहायला लागली आणि मी सरसावून बसलो. म्हटले आज आपल्याला चिक्कार ज्ञानामृत मिळणार.

"मग अभ्यास काय म्हणतो? कशाने वाढते महागाई?" मी

"दोन गोष्टीमुळे वाढते. एक अडत लोकांच्या कोंडाळयामुळे. व दुसरे मगरमच्छासारखा विळखा घालून बसलेल्या एम् सी एक्स वरच्या सटोडियांमुळे. समजलास?"

माझ्या तोंडाचा वासलेला "आ" बघून शाम्या समजला की मला कांहीच समजलेले नाही.

"पम्या आहेस का रे घरी" ही आरोळी पक्याची होती.

"अरे वा! शाम्या तू पण आहेसच का? काय बौधीक घेतोयस का पम्याचे? वैनी जरा चहा टाकता का?" अनेकावर एकाच वेळी पक्याने शरसंधान करून आटोपते घेतले. एवढयात सौ बाहेर आली. "प्रकाशभावजी नुसता चहा की बरोबर कांही? म्हणजे बिस्कीटे चालतील की पोहे बिहे टाकू?" हे विचारताना तिची नजर माझ्या नजरेशी मिळाली व बॉडी लँग्वेज म्हणजे काय ते मला पूर्णतः समजले. एकंदर आविर्भावा वरून मी समजलो "लवकर आटोपते घ्या नाहीतर दुपारच्या जेवणाला पक्या नावाचा बकासूर थांबला तर तुम्हाला जेवण मिळणार नाही."

खरतर पक्या आल्यामुळे मला फार बरे वाटले होते. शाम्याची माहिती आता तपासून तावून सुलाखून मला मिळणार होती. शाम्या जे सांगे ते एकटा असलो की सर्व पटत असे. पण पक्या आला की

तो शाम्याला ठीकठीकाणी अडवून, प्रश्न विचारून, कित्येक विधाने खोडून काढी. म्हणूनच मला अगदी पूर्ण सत्य माहिती मिळत असे.

“तर मी काय सांगत होतो. एम्.सी.एक्स वरच्या सटोडीयामुळे सगळ्याच कमोडीटीचे भाव उगाचच वाढतात. गरज नसताना हे लोक कडधान्ये, मसाल्याचे पदार्थ, रवा, कापूस, तेलबिया टनात खरेदी करतात. गरज नसताना व भाव दोन चार रुपये वाढला की विकून नफा कमवतात.” शाम्याचे आख्यान पुढे चालणार होते पण मधेच पक्याने नाक खुपसले.

“एम् सी एक्स म्हणजे?”

“तुला एम् सी एक्स माहीत नाही? कुठच्या जगात आहेस तू? अरे आपल्या जीवनाशी अगदी एवढी निगडीत गोष्ट तुला माहीत नाही?”शाम्या

“शाम्या शब्दात मी फसत नाही. तुलाही माहीत नाही सांगना. पाल्हाळ कशाला? एम्.--सी.—एक्स. प्रत्येक अक्षराचा शब्द काय तो उच्चार आणि फुल फॉर्म म्हणतात तो सांग. पाल्हाळ लावू नकोस.” पक्या

“एम्.सी.एक्सच म्हणतात रे त्याला. तिथे कोट्यावधी रुपयांची उलाढाल होते रोज. तिथेच खूपशा गोष्टींचे भाव ठरवतात. दिवसभर वर खाली होतात. हे सगळे करून नफा तोटा करत

बसतात ते सटोडीये. त्यांनीच वात आणलाय या महागाईचा" आता मलाही वाटले, शाम्या विषयाला बगल देतोय.

"एम्.सी.एक्स. माहीत नाही ना? फेकू नकोस. पूर्ण फुल फॉर्म सांग" पक्या.

"कमोडिटी एक्सचेंज म्हणतात रे" शाम्या

"सी. एक्स झालं फार तर. एम्. म्हणजे काय?" पक्या

"अरे विषय महत्वाचा की नांव?" शाम्या चिडचिडा होऊ लागला असे मला वाटू लागले. आमची सौ. चहा उकळत ठेवून ही जुगलबंदी हंसऱ्या डोळ्यानी पाहात होती. मी मनांत समजलो, आता उकळून उकळून गाढ झालेला चहा प्यावा लागणार. त्याने शाम्या वैतागणार पण पक्या खूष होणार. पक्याला चांगला कडक चहा लागे तर शाम्याला अगदीच लाईट. असे हे सर्वच प्रकारे प्रकृतीने, विचाराने, वागणुकीने, आवडी निवडीने विसंवादी असलेले माझे मित्र आमच्या मध्यमवर्गी जीवनाशी निगडीत नसलेल्या विषयां वरून का भांडतायत हा विचार आला आणि मी विचार समाधितून बाहेर पडलो ते शाम्याच्या जोरदार वाक्याने

"साल्या पक्या! वकील का नाही झालास? माझी उलट तपासणी चालवली आहेस. विषय ऐकशील? जगात काय चाललंय हे जाणून घेशील? थोडं तरी जनरल नॉलेज मिळवशील?

की फक्त नकाऱ्यासारखा बोलणाऱ्याची टवाळीच करत बसशील रे?"

मी सावरून बसलो. आता खरी जुगलबंदी चालू होणार वाटले. सौ.चहाच्या आठवणीने स्वयंपाक ......नाही किचन मधे धावली. आणि रविवारी सदैव उघडे असलेल्या आमच्या दारातून मंजूळ आवाजात एक वाक्य आमच्या कानांवर गोड आघात करीत असल्यासारखे वाटले.

"कोण भांडतायत रे पक्या? कोण कोणाला जनरल नॉलेज देतंय रे?" ही शरु होती. आमची बाल मैत्रीण. मी आनंदलो. आमच्या कॉलनीतले आम्ही चार जण एकत्र झालो होतो. अजून दोघे देखिल येणार याची खात्री वाटत होती. एवढयांत सौ.चहा घेऊन बाहेर आली. शरुला बघताच हंसत म्हणाली, "अरे! शरयुताई तुम्ही पण आलात? या! या! बसा तुमचाही चहा आणते हां!" असे म्हणत सौ. ने शाम्याला, पक्याला आणि मला स्वहस्ते चहा दिला. सहज पक्याच्या कपाकडे लक्ष गेले तर तो मस्त केशरी, सोनेरी दिसत होता. माझा कप मात्र काळपट दिसत होता म्हणजे माझ्या कपात दूध घालत आसतानाच सौने शरयुचा आवाज ऐकून हात आवरता घेतला असावा, असा रास्त संशय मला आला.

"शरयुताई! चहा घ्या. बसा इथेच, सगळे तुमचे शाळकरी मित्र ना! बसा बोलत. मी आलेच!" सौ.

"थांब ग जरा! हा डबा घेऊन जा. दुधीच्या मुठीया केल्यात. पम्याला फार आवडतात ना? म्हणून केल्या. आणि रविवारी म्हणजे सगळे जमणार म्हणून भरपूर आणल्यात. जेवायला सगळे थांबले तरी पुरतील एवढया आहेत." शरयु.

"अग शरे! पक्या जेवायला थांबला तरी पुरतील का ग?" शाम्याने मगाचचा वचपा काढला. सौ. ने डबा घेतला आणि पुढच्या शब्दयुध्दातून सुटका व्हावी म्हणून आपल्या कार्यक्षेत्रात म्हणजे स्वयंपाक घरात मोर्चा वळवला.

"का रे शाम्या, मी किती खातो जेवतो ते वजन करून ठेवतोस का? काय काय पचवतो ते ही लिही, म्हणजे एम.सी.एक्स. वर कशा कशाचे भाव वर जाणार ते सहज समजेल तुला. अरे गाढवा! या सुगृहीणी एवढ्या मरून आपल्यासाठी एक एक वानग्या बनवतात, त्याला दाद नको का द्यायला? एकतर स्वतःत रसिकता नाही. आणि दुसऱ्याना बोलतो." पक्या

तुझा रसिकपणा जेवणा खाण्यातच दिसतो कसा रे? बाकीच्या गोष्टीत दिसत नाही तो?" शाम्या.

"तू नाटक पहातोस? नाही ना? मी पहातो. तू गाण्याच्या कार्यक्रमाना जातोस? नाही. मी जातो. एकादा पेग मारतोस का मित्रांबरोबर? मी अगदी राजरोस मारतो. लग्न झाले तरीही बायको

बरोबर असताना एकादीच्या सौंदर्याची तारीफ करतोस? ती ही बायको समोर? मी करतो. रसिकची व्याख्या तरी माहीत आहे का? अरे पम्याकडे बघ. लग्ना अगोदर त्याच्यावर मरणाऱ्या शरे बरोबर अजूनही मैत्री टिकवून आहे. ती देखिल वहिनींसमोर. रसिक नुसतं असून चालत नाही. हिम्मतवाला पण असावं लागत. बिनधास्त पणा लागतो." पक्या ताडताड फटाके उडवत होता. पण आता ते माझ्या पायात फुटतायत असे वाटू लागले. माझ्या आणि शरेच्या मैत्रीचा दाखला देऊन त्याने माझ्यावर फार बांकी वेळ आणली होती. सहाजीकपणे माझी नजर स्वयंपाक घराच्या दाराकडे गेली. सौ जळजळीत नजरेने माझ्याकडे पहात आहे वाटून पंख्याखालीही मला घाम फुटत होता.

"काय रे कोण आहे रे हिम्मतवाला रसिक? कोण कोण जमलायत रे? मला टांग मारून कसला विषय चघळताय?" प्रश्नांची फैरी झाडत सुऱ्या प्रवेशला.

"या! सुरेंन्द्रराव या! तुमचीच गरज होती." शरेने सुऱ्याचे स्वागत केले.

"अरे वा! आज शरयु आमचे स्वागत करते आहे. पम्या काय बिनसलेय काय रे तुझे शरे बरोबर? आज तिला माझ्या स्वागतासाठी सवड मिळाली? "कॉलेजला सोडू का?" एवढेच विचारले होते मी बारा वर्षापूर्वी. त्यावेळापासून अबोला धरलेली

शरी आज स्वागत करतेय?" सुऱ्या आपल्या प्रश्नांची फैरी सोडत होता. पण त्यांतही शरेची आणि माझी मैत्री उघडपणे दाखवून देण्याचा प्रयत्न करीत होता. तो मला बोचत होता.

"वा रे वा! सुऱ्या! तुझ्या लग्नात नाही का बोलले तुझ्याशी? आणि तीन चारदा घरी देखिल आले तुझ्या. तुझ्या बायकोने केवढा संशय घेतला तेव्हा माझ्यावर. आठवते ना? मग तुझ्या साक्षीनेच मी ते स्कुटरवरून कॉलेजला सोडायचा तुझा प्रताप तिला सांगीतला. मी तुला काळतोंडया म्हटलेलेही तुझ्यासमोरच सांगीतले. तेव्हा कुठे तिचा राग निवळला. आठवते ना?" शरयु सुऱ्याला साग्रसंगीत आठवण करून देत होती.

माझ्या मनांत विचार आला आणि एकदम् तोंडातून बाहेरही पडला

"एकाद्या बाईने दुसऱ्या बाईच्या नवऱ्याला काळतोंडया म्हटलेले ऐकून ती दुसरी बाई शांत व्हायला पाहिजे की रागाने उसळायला पाहिजे?"

"पम्या तू अजून अंड्यातच आहेस रे. अशा गोष्टी संदर्भ वशात तसे तसे परिणाम, त्या त्या लोकांवर करतात." हे क्लिष्ट विवरण शाम्या शिवाय दुसरे कोण करणार?

“अरे! खरोखर तर बायकाना आपल्या नवऱ्याना नामोहरम करायची फार असुरी इच्छा असते. पण नवऱ्याच्या भानगडीचा निर्वाळा मिळत असेल तर दुसऱ्या बाईने केलेला पाणउतारा पण चालतो. असं मला तरी वाटतं” नुकताच दारातून आत आलेला अव्या आपल्या लांब मानेने बरेचसे पूर्वीपासूनचे ऐकून आपला शेरा देत होता.

“अरे! काय रे पम्या, पण कोणाची बायको शांत झाली तुझी? का चिडलीय वहिनी? ही शरी आलीय म्हणून? मग तुला काय नावं ठेवली कुणी? तेव्हा शांत झाली? मला समजवा तरी.” अव्याच्या प्रश्नांची मालीका सुरू झाली होती.

“अहो अविनाश भावजी! मी कशाला चिडणार मला माहीत आहे शरयुताई यांच्या बालमैत्रीण आहेत त्या. त्या येतात माझ्याकडे नेहमी. आम्हीही मैत्रीणी झालोत. मला सगळे सगळे माहीत आहे. मग मी कशाला चिडू?” आमची सौ उपमा व मुठीयाच्या बशा ट्रे मधून आणता आणता सांगत होती.

“अरे पम्या! वहिनीना गंडवलंयत काय रे तुम्ही? त्यांना माहीत आहे की नाही? शरेने अजुन लग्न देखिल केले नाही. तुझ्यावर केवढी मरत होती ती. पण तू काय दाद दिली नाहीस. लग्न घरच्यानी ठरवलं म्हणून सांगून पळ काढलास. माहीत आहे हे वहिनीना? तरी देखिल वहिनी शांत? ग्रेट! ग्रेट आहात हो वहिनी तुम्ही. आमची

असती तर?..... बापरे याद पण नको" सुऱ्या आपले काड्या लावण्याचे काम छान करीत होता.

"अरे! कसले भांडणाचे विषय घेऊन बसलाय, कांहीतरी कंस्ट्रक्टीव बोला ना. हे कसले विषय" शाम्या आपल्याला बोलण्याची संधी शोधत होता.

"पण शरयुताई, तुम्ही आमच्या ह्यांच्यावर एवढया का फिदा होता हो? काय पाहिलेत त्यांच्यात" सौ ने हा प्रश्न विचारला आणि मला मेल्याहून मेल्यासारखे झाले. माझ्या सगळ्या मित्रांसमोर ती मला बावळट ठरवीत होती. हा माझा समज होत नव्हता तर ठाम पणे वाटत होते.

रक्त एकदम उसळून आले आणि तोंडातून सौ साठी प्रश्न निघून गेला. "तिला कशाला विचारतेस? पहिल्याच झटक्याला मला पसंत केलेस तेव्हा काय पाहिलेस माझ्यात? तेच तिने पाहिले असणार. म्हणून ती फिदा..." बाण सुटून गेला होता. माझे वाक्य कांहीतरी चुकले असे वाटत होते. तो कबुली जबाब झाला होता की काय?

शरयु लाजेने लाल झाली होती. सौ. रागाने लाल झाली होती आणि माझी फजीती पहाणारे मित्र हसून हसून लाल झाले होते. मी

मात्र सगळ्यांकडे आळीपाळीने नजर फिरवत व आपण किती बावळट आहोत याची खंत करत बसलो होतो.

"अरे हमे छोडके आप सब क्या खलबते कर रहे हो." ही एंट्री नंदूची होती. एंट्री बरोबर कुठल्यातरी परफ्यूमचा किंवा सुगंधी केशतेलाचा किंवा चहेऱ्यावर जाड थर असलेल्या पावडरचा एक मंद वास सगळ्याना आला. लाल चट्टेरी शर्ट, गुडघ्याच्या वर फाटलेली व कमरेच्या कितीतरी खाली घसरलेली जीन, झुलपे काढलेले केस, डोळ्यावर गॉगल व हातात रजनीगंधा पान मसाल्याचा डबा, शर्टाची वरची दोन तीन बटणे न लावताच छाती व गळ्यातील सोन्याची जाड चेन दाखवत नंदूने ठुमकत चालत एंट्री घेतली होती व न येणारे हिंदी पाजळत हिंदी हिरोची नक्कल करीत होता.

"काय हल्ली कुठला सिनेमा?" सुऱ्याने प्रश्न फेकला. उत्तर आलेच नाही. "सद्या कोणत्या नटीवर फिदा हो." अव्याने मान उंच करीत विचारले. नंद्या लाजल्यासारखा वाटला खरा पण गालावरचा पावडरचा थर काही लालूस झाला नाही.

नंद्या बोलत नव्हता. नुसत्या ऍक्शन करीत होता. तो चाळीशी उलटून गेली तरी गद्धे पंचवीशी संपलीच नाही असाच वागत असे. एकंदर हावभावावरुन, न बोलण्यावरून व तोंडात नुकत्याच

भरलेल्या रजनीगंधाच्या तोबऱ्यावरुन मला वाटले हा आमिरखानच्या पीकेची नक्कल करण्याचा प्रयत्न करतोय.

"पीके काय रे? आमिरखान होतोयस?" मी विचारले. रजनीगंधा तोंडात सावरत तोंडाचा चंबू करत तो म्हणाला

"बळोब्बळ! वम्या (पम्या) टयू एकटाच शाणा रे. टुला समजले. वॉकी इनडोक" अर्धे अधिक कुणालाच समजले नाही सगळयांच्या चेहेऱ्यावरची प्रश्न चिन्हे बघून मीच म्हणालो "अरे तो मला सांगतोय- बरोबर पम्या तू एकटाच शाणा रे तुला समजले. बाकी सगळे बिनडोक" मी नंद्याचा वापर करत सगळयाना बिनडोक म्हणून घेतले.

अर्थातच "बिनडोक" हा शेरा शाम्याला चालणारच नव्हता. स्वतःच्या हुशारी बदल सार्थ अभिमान बाळगणारा शाम्या तडकून बोलला, "काय रे नंद्या! बेबी नंदाच्या नवऱ्याचे नांव सांग. साल्या, तुझ्याच फिल्ड मधले प्रश्न विचारतो सांग उत्तर. राजकपूर आणि अनिल कपूर भाऊ भाऊ आहेत ना?"

"ए शाम्या तुला काय सगळयांची परीक्षा घ्यायची खुमखुमी येते काय?" पक्याने शाम्याला कापला आणि नंद्याला सोडवला.

"अहो! हे सर्व इथेच जेवणार का? मला जेवणाची तयारी करायचीय"

“वहिनी मी नाही. आज घरी मस्त मासे आहेत” शाम्या

“मी पण नाही.” सुऱ्या

“सुऱ्या मेनू सांगू नकोस. अभद्र कांही तरी खातात. वैनी मी नाही.” पक्या

“अरे बोलणे अभद्र असते, खाणे नाही कोणताही शब्द कुठेही वापरतोस?” शाम्या

“तुला समजले ना काय म्हणायचेय मला ते? मग झाले. तुला समजले म्हणजे सगळ्याना समजले असणार.” पक्या.

“मी णाही व्हो वयणी” तोबरा सांभाळत नंद्या बोलला.

“ए शुभा! मी आहे हो. मी थांबते, घरी एकटीच काय जेवू? इथे तुमची कंपनी तर मिळेल.” शरयुने सौला सलगीने सांगीतले आणि सौची नजर छद्मी हंसत माझ्यावर पडली.

सगळे जाणार होते फक्त शरयु जेवायला थांबणार होती. कंपनी मिळावी म्हणून. कोणाची ते समजते हो! असा पूरा छद्मीपणा होता त्या नजरेत.

मी काळजीत पडलो होतो. सौ. ला माहीत असलेलेच सर्व कांही आज परत उगाळले गेले होते. तरी देखिल तिचा पारा चढत होता. आजची रात्र माझ्यासाठी वैऱ्याची असणार हे पक्के दिसत होते. मी गहन विचारात पडलो होतो. आजूबाजूला सगळे मित्र

जोरजोरात बोलत होते. एकमेकांच्या तंगडया खेचत होते. हसत होते. सर्व काही कानावर पडत होते पण मी त्यात नव्हतोच. एवढयात पाठीवर जोरदार थाप पडली आणि भानावर आलो.

“काय रे कुठे हरवलास पम्या? सुऱ्या काय विचारतोय ऐकलेस?” पक्या विचारात होता.

“काय? काय रे सुऱ्या?” मी.

“अरे ही शरु एवढी तुझ्यावर मरत होती, जीव ओवाळून टाकत होती, तिला गटलास कसा नाहीस?” सुऱ्या.

मी कावराबावरा होत आजूबाजूला पाहिले. शरु हिला मदत करायला गेलेली बघून हायसे वाटले.

“ए! बस झाला रे वाह्यातपणा. मला मुसीबत मधे आणाल रे अशाने” मी

“अरे! नको रे छळूत त्या गरीब पम्याला. बघा केवढा गरीब आहे तो. त्याची बायको आणि प्रेयसी दोघेही जण झटतायत त्याला जेवण करून घालायला.” नंद्या आता रजनीगंधाचे तोंड विसळून आलेला होता “पण कांही म्हणा हां! हा पम्या गरीब नाही महान आहे. बघा दोघीनाही कसं सुंदर मॅनेज करतोय ते. साल्यानो एकीला सांभाळताना तोंडाला फेस येतो तुमच्या. हा बघा दोघीनाही कसे मॅनेज करतो. गुण्यागोविंदाने राहातात दोघीही.” अव्या उंच मान

काढून बोलत होता पण त्यांत त्याची हताशा असल्याचा संशय मला आला. याला जमते ते मला का नाही, ही ती हताशा असावी.पण खरे सांगू? मी शरेकडे कधीही त्या दृष्टीने पाहिलेच नव्हते. ती वेडपटच वाटायची.

माझे लग्न ठरले त्यावेळी म्हणे ती रडली

रिसेप्शनला आली त्यावेळी आपली ओळख "तुझ्या या नवऱ्याची जीवाभावाची खास मैत्रीण" अशी आमच्या सौ ला स्टेजवरच सांगून मला हादरवले.

आणि लग्नाच्या चौथ्या दिवशी "ए शुभा! ए शुभा!" करीत, ओरडत आमच्या घरात शिरली. आमच्या सौ मधे आणि तिच्यात काय बोलणे झाले हे आजतागायत अत्यंत मोठे गूढ आहे. पण एवढे खरे की शरु कायम येवू जावू लागली. शरु वरुन टोमणेमारून सौ मला हैराण करू लागली. शरु आली की तिच्याशी मैत्रीणी सारखी वागे पण माझ्यावर जळत्या नजरेचे कटाक्ष पडत राहात. लग्नाला दहा वर्षे झाली तरी हा नियम कांही बदलला नाही. आज हा विषय सगळया मित्रानी परत उगाळला होता. जरा जास्तच उगाळला होता. आता एकांत वैऱ्याचा होणार होता.

हळू हळू सगळे कटले. आज शेरेने टॉवेल कपडे बाथरुम मधे लटकवले व मला ऑडर सोडली."पम्या आंघोळ कर लवकर

जेवायला बसुया म्हणजे मला लवकर घरी जाता येईल. शुभा जेवण लावतेच आहे टेबलवर. ”

आयला! या बायकांचे काही समजतच नाही. माझे कपडे, बाथरुम मधे ते ही शेरेने ठेवले. आमच्या सौच्या सांगण्या वरून? मी गरगरायला लागलो. थरथरायला लागलो, तोंडाला कोरड पडली होती. आज दुपारीच बॉंब पडणार असे वाटू लागले. मुले, आजोबा आजी बरोबर गांवी गेलेले. शरु गेली की आम्ही दोघेच घरात रहाणार होतो. मग त्याची युद्ध भूमी होणार होती.

थंड पाण्याच्या शॉवर खाली उभा होतो. डोक्यावरुन घरंगळणारे पाणी पायावर पडे पर्यंत कडकडीत झालेय असा भास होत होता. डोके फार विचाराने तापलेय असे वाटत होते.

जेवणाच्या टेबलावर गप्प बसून जेवू लागलो. “ए पम्या! अरे गप्प का! बोलना काही तरी.” शरेने हुकूम सोडला “कसल्या समाधीत शिरलाय हो कोणाची आठवणी करताय मनांत” सौ चे हे शरेला दिलेले अनुमोदन सूचक होते.

“कुठे काय! काही नाही काही नाही.” मी कांहीतरी बडबडायचे म्हणून बडबडलो. नाहीतरी काय सांगणार होतो?” शरे तू गेलीस की माझी धडगत नाही काय काय होणार त्याची उजळणी चाललीय मनात” हे थोडेच सांगणार होतो या बायाना.

मग जेवणे आटोपली. सौने मुखवास वाटला आणि शरयु जाता जाता म्हणाली “पम्या येते रे मी. आता पुढच्या रविवारी येईन.” तिने फक्त मलाच सांगीतले हे बघून सौ.ने भुवया उंचावल्या, उजव्या हाताने “हे काय”ची मुद्रा केली. आणि तोंडाचा आ देखिल वासला. अर्थ सहज समजला. “बघा तुम्हालाच सांगून जातेय. मी खिजगणतीतच नाही तिच्या” असाच आशय या आर्विभावातून निघत होता.

जाता जाता शरेने माझा पूर्ण घात कसा होईल याची काळजी घेतली होती. सर्वच गेले होते. घरात मी आणि सौ. ही स्थिती मांजरीच्या समोर उंदीर, वाघीणीसमोर बोकड, कोल्हीणीसमोर कोंबडा अशी होती. मी आता काय करावे या विचारात असतानाच सौ म्हणाली “चला! जरा पडते मी. दमला जीव रविवार असूनही. तुमचा रविवार पण आमचे कांटे ढिले करतो.” ती बेडरुमकडे निघाली.

मी देखिल त्रासलो होतो, विचारानी डोके भिरभिरत होते. थोडया वामकुक्षीची मलाही गरज होती. मग जाऊ का बेडरुम मध्ये. नको बाबा! रात्री ऐवजी आत्ताच महाभारत सुरू व्हायचे. सोफ्यावरच लवंडू का? नको मग हिला समजेल आपण टरकलोय ते. थोडा वेळ जाऊ दे. मग जाऊ. तो पर्यंत ही झोपेल. टु बी ऑर नॉट टु बी चा अर्थ आत्ता पूर्णपणे समजत होता. कॉलेज मधे हॅमलेट

शिकताना जे समजायला कठीण पडले होते ते आता बरोबर ध्यानात आले होते.

उठलो चोरपावलानी बेडमधे शिरलो. सौ बेडवर एका बाजूला तोंड करून कुशीवर झोपली होती. मी झोपलो की तिची पाठच माझ्याकडे होणार होती. बरे वाटले. सावधपणे बेडवर बसलो. लवंडत होतो एवढयात सौ वळली. सताड उघडया डोळयानी माझ्याकडे पहात म्हणाली, “आलात? या! केव्हाची वाट पहात होते. काय वेळ काढत बसला होतात ना? माझी झोपायची वाट पहात होतात ना? पण मी आज तुमच्याशी बोलल्या शिवाय झोपणारच नव्हते.”


माझे ठोके राजधानीच्या इंजिनापेक्षाही जोरात सुरू झाले. तोंडाला कोरड पडली. आता नुसते श्रोता व्हावे लागणार हे समजून मी लवंडलो. उजवा हात डोळे व कपाळ झाकत डोक्यावरुन घेतला. तोंडातून निघाले जे खरोखरच त्रिकाळाबाधीत सत्य होते. “हे बघ माझे त्या शरे बरोबर कोणतेही लफडे नाही व नव्हते. मी माझ्या मुलांवर, तुझ्यावर व आपल्या सर्वच घरावर, घरातल्या वस्तुंवर फार फार माया करतो. हे टारगट उगीचच मला चिडवत असतात. आणि ती शरी तर आगावूच आहे. सारखी सगळ्याना कांही तरी सांगत फिरते वेडपटा सारखी. आणि तू विश्वास ठेवतेस.” डोळे मिटून पडून रहावे वाटत होते. पण.......

सौ जोरात हंसत होती थांबतच नव्हती. मी ताडकन उठून बसलो. थोडया वेळाने हंसू आवरत म्हणाली, "केवढे घाबरता हो! अहो मला माहीत नाही का शरयुबदल? ती किती वेडपट आहे ते माहीत आहे मला. तुम्हालाच माहीत नाही ती अशी का वागते. तिने का लग्न केलं नाही. तिला वाटतं तुम्ही तिच्याचवर प्रेम करता. पण आई वडिलांच्या धाकामुळे तुम्ही माझ्याशी लग्न केलंत. पण मला माहीत आहे, तुम्ही तुमची माझ्याबदलची निर्व्याज पसंती पहायला आलेत तेव्हाच दिली होतीत. मला तुमच्याबद्दल खात्री अगदी पहिल्यापासून म्हणूनच आहे. तुम्ही एवढे काही बावळट नाहीत शरयुला पसंत करायला. मला तिने देखिल सांगीतले की तुम्ही तिच्यावरच प्रेम करता. म्हणूनच माझं नाव शुभा ठेवलंत. शरयुतल्या "श" वरून. तेव्हाच मी समजले ही वेडाबाई आहे. पण तिने लग्नच न करण्याचा हट्ट धरला मग मला तिची कीव आली. तुमच्याबदल खात्री होती म्हणूनच मी तिला घरात येवू जावू दिलं. एवढया वर्षात तुम्ही ओळखलंतच नाही मी तुमची फिरकी घ्यायचे ते? आज मात्र तुम्ही फार घाबरलेले दिसलात म्हणून हे सांगून टाकले तुम्हाला. बावळटच आहात."

आता मला बावळट म्हटले तरी राग नव्हता आला. भांडणाचे सगळे ढग पळून गेले होते. भरदुपारी बेडरुम मधे चंद्र, तारे उतरले होते त्यांनी आमच्या भोवती फेर धरला होता.

बस्स् बस्स् पुढे काय झाले म्हणून विचारू नका.

*****


वाकळ

वाकळ हा शब्द कोल्हापूरला परत ऐकला. लहानपणी वडील ५ वाजता उठत. सकाळचे संस्कृत श्लोक, कुठले तरी स्तोत्र झाल्यावर ते त्यांची आवडीची कविता म्हणत. या वेळी मी त्यांच्या कमरेवर एक पाय व छातीवर एक हात टाकून घट्ट मिठी मारून जाग्या झोपेचा आस्वाद घेत असे. आपल्या न कमवलेल्या आवाजातील ती कविता मी स्मृतिचित्रात लिहायचा प्रयत्न केला आणि अर्धवट आठवली तशी लिहीली.

...........

हा तुझाची पावा, मोरवेलीची काठी
घेऊनी बसते रोजच पोटीपाठी

............

हे तुझ्या डोईचं जुनं जरी मुंडासं
कुरवाळत बसते होतं माझं हास
ही तुझीच थाळी म्हणुन चाटते राया
मज लागीर झालं म्हणती आया बाया
हा तुझा अंश जो येईल जन्मापोटी

घालून समदं पाहीन डोळे भरुनी

..............

मग खुशाल तिरडी बांधा माझी कोणी.

चार पाच ओळी मला आठवत, तर चार पाच माझी मधली बहीण सांगे तरी देखील कविता पूर्ण होईना. जिथे पूर्ण विरामांची रांग आहे तिथले शब्द काही केल्या आठवेनात. खूप वर्षे गेली होती मधे. बाबा चाळीशी ओलांडत होते त्यावेळची गोष्ट. आज मीच सत्तरी ओलांडलीय. काय आठवणार? पण जिद्द ठेवली कविता शोधून काढायची.

या कवितेला जोडलेले प्रसंग आठवून ओळी मिळतात का पहात होतो.

माझ्या सर्वात मोठ्या बहिणीने तीन चार जुन्या साड्या व धोतरे काढून माझ्यासाठी गोधडी शिवायला काढली होती. आठवले. मी वडलांना वाकळ शब्दाचा अर्थ विचारला होता. त्यांनी सांगितलं अरे वाकळ म्हणजे गोधडी. बहिणीची गोधडी पुरी झाली. मी पांघरून उब अनुभवत होतो आणि दोन ओळी आठवल्या

ही तुझीच वाकळ म्हणुन मला लै प्यारी

पिरतीची आवड समद्याहून रे न्यारी

काय आनंद झाला. कविता बरीच पुरी झाली होती.

तरी देखिल काहीतरी अजून बाकी आहे वाटत होतं.

ही व्यथा एका बाईची, जिचा धनी पानीपतच्या लढाईतून परत आला नव्हता. त्याचे कपडेच परत आले होते. ती त्या वेळी गरोदर होती. तीची व्यथा वडील म्हणायचे तेव्हा मनाला भिडत होती. स्मृति चित्र अपुरंच रहात होतं.

एक दिवशी आमच्या मित्र वर्य सुहासरावानी ती स्मृतिचित्र वाचली. आणि म्हणाले, "माणेकरावांच्या लायब्ररीत खूप कवितांची पुस्तकं आहेत. घेऊन येतो. बघ त्यात मिळते का ही कविता. परत एकदा धडपड सुरू झाली. कवितांची जुनी जुनी पुस्तकं, त्यावेळचा भाषेचा बाज मनात ठसत होता. पण माला पाहिजे ती कविता मिळत नव्हती.

परत सुहासराव खोपकर चार पाच पुस्तकं बदलून घेऊन आले. कवी यशवंतानी लिहलेल्या कवितांचं एक जुनं पुस्तक त्यांनी राजमाता महाराणी चिमणाबाईना भेट दिल्याच्या नोंदी सह हाती आलं. रविकीरण मंडळानं प्रकाशीत केलेला उषा कविता संग्रह, १९२४ साली प्रसिद्ध झालेला. तो चाळताना ही कविता अचानक समोर आली.

आनंदाला पारावार उरला नाही. अक्षरशः तुटून पडलो. सगळी टाईप केली. आमच्या चुका नेमक्या समोर आल्या. आणि काय

चुकतंय, कशाची हुरहुर हे सगळं समजलं. ती पूर्ण कविता नावा सकट अशी होती,

प्रेमाची दौलत

ही तुझीच वाकळ म्हणुनि मला लै प्यारी
पिरतीची आवड समद्याहुनि रे न्यारी॥
झालीत लक्तरं तरीही मजला गोड
पुरविते प्रेम पाहिजेल त्यांचे कोड॥
ही तुझीच थाळी म्हणुन चाटते राया
मज लागीर झालं म्हणती आया बाया ॥
हा तुझाची पावा, मोरवेलीची काठी
झोपते घेऊनी रोजच पोटीपाठी॥
हे तुझ्या डोईचं जुनं जरी मुंडासं
कुरवाळत बसते होतं माझं हास ॥
हे तुझ्या अंगचं जपुनी ठेविलं कुडतं
ही दौलत माझी वेडंच त्याचं जडतं॥
माझ्या कोण जो पोटी येईल
तो जवा बापया म्होरं होईल॥

हे घालून त्याला पाहिन डोळे भरुनि
मग खुशाल तिरडी बांधा माझी कोणी
कवी यशवंत १-९-१९२४ येरवडा
रविकिरण मंडळात प्रसिद्ध ८-२-२०२४.


माझ्या गोधडीचा उसवलेला शेव आज शिवला गेला होता. त्याची उब प्रकर्षाने जाणवत होती. वडीलांच्या वर तसाच पाय व हात टाकून ती कविता ऐकतोय असं वाटून आनंदी होत होतो. इच्छा शक्तिची कमाल अनुभवली होती.


स्मृति चिन्हातून

*****

श्री अरूण कुळकर्णी यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके.


कव्हरवर क्लिक करताच उघडतील












एकटे जीव कथा संग्रह व इनामदारीण कादंबरी  यांना मराठी रसिकानी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून लिहायची ऊर्जा वाढली. सुहास्यरेखा प्रकाशनच्या सुहास खोपकर यांनी प्रसिद्धी व वितरण अत्यंत हिरीरीने केले.
पुस्तकाचे अभिप्राय येत असताना कुणी तरी सुनील सामंत यांची ओळख दिली. पुढची पुस्तके ई-साहित्य वर प्रकाशित होत गेली. त्यांनी इनामदारीण व एकटे जीव देखील डिजीटल फॉर्ममधे प्रकाशित केले. या सर्व पुस्तकांना आंतरराष्ट्रीय प्रतिसाद मिळालेला पाहून आनंद वाटला.
मैत्रबंध, तीन शिल्पकार, त्रिवेणी संगम या ई-साहित्य वर नंतर प्रकाशित झालेल्या पुस्तकांना देखील असाच सुंदर प्रतिसाद मिळाला.
रसिकांच्या अभिप्रायात एक शेरा कायम असे. "भाषा अत्यंत ओघवती असून सर्व डोळयासमोर उभे रहाते." यामुळे पुढील लिखाणाला जोर आला.
या आठ गोष्टींचा हा संग्रह म्हणजे मी अनुभवलेल्या माणसांचा किंवा प्रसंगांचा आलेख आहे. काही हसवणारा काही भावविभोर करणारा अनुभव आपल्याला वाचताना येऊ शकतो. थोडे हसू...थोडे आसू असाच काहीसा.
आपला अमुल्य अभिप्राय प्रत्येक कथेसाठी पाठवाल ही अपेक्षा.

अरुण कुळकर्णी
संपर्क
७३५९२१२२११ किंवा ७२२८८८४०३०
Arungk1943@gmail.com

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १३ वे वर्ष.

## अरुण कुळकर्णी यांचे ईसाहित्यवर हे सहावे पुस्तक.

अरुण कुळकर्णी खरे तर चित्रकार व्हायचे. त्यांच्या कथा म्हणजे रंगांची उधळण असते. मानवी मनातल्या भावतरंगांचे रंग ते नेमके टिपतात आणि ती ती छटा त्यांच्या शब्दांतून व्यक्त होते. त्यांची कता वाचक वाचत नाहीत, पहातात. एखाद्या चित्रपटासारखी. पण चित्रपट द्विमितीत असतो आणि अरुण कुळकर्णींच्या कथांना तिसरी मिती असते. त्यांच्या व्यक्ती आपल्या आयुष्याचा भाग होतात. मग ती इनामदारीण असो, तीन शिल्पकारांतले ते ग्रामीण कुटुंब असो की मैत्रबंधांतली इवली मैत्रीण.

अरुण कुळकर्णी यांची पुस्तके नामवंत प्रकाशकांनी छापून प्रसिद्द केली आहेत. पण त्यांनी आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमा-तून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य दिली. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४),

मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।